नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com




* वर्ष ५२ * अंक १६८ * * अकोला * रविवार, दिनांक २१ डिसेंबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## थोडक्यात..

### एलव्हीएम ३ चे २४ ला प्रक्षेपण



■ **श्रीहरीकोटा :** भारतीय अंतराळ संशोधन संस्था पुन्हा एकदा आपले कौशल्य दाखवणार आहे. एलव्हीएम ३ रॉकेटचे सहावे ऑपरेशनल उड्डाण २४ डिसेंबर रोजी सकाळी ८:५४ वाजता आंध्र प्रदेशातील श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रावरून प्रक्षेपित होणार आहे. या मोहिमेला ब्लूबर्ड ब्लॉक-२ मिशन असे नाव देण्यात आले आहे.

हे पूर्णपणे व्यावसायिक मिशन आहे, जे अमेरिकन कंपनी नासा स्पेसमोबाइलचा ब्लूबर्ड ब्लॉक-२ कम्युनिकेशन सॅटेलाईट वाहून नेईल. अंदाजे ६.५ टन वजनाचा ब्लूबर्ड ब्लॉक-२ उपग्रह हा लो अर्थ ऑर्बिट मध्ये तैनात केला जाणारा सर्वात मोठा व्यावसायिक संप्रेषण उपग्रह असेल.

### राजधानी एक्सप्रेसच्या धडकेत आठ हत्ती ठार

■ **गुवाहाटी :** आसाममधील होजई जिल्ह्यात शनिवारी पहाटे रेल्वे अपघाताची धक्कादायक घटना घडली. सैरंगहून नवी दिल्लीकडे जाणारी राजधानी एक्सप्रेस धावत्या अवस्थेत असताना अचानक हत्तींच्या कळपावर आदळली. या अपघातात आठ जंगली हत्तींचा मृत्यू झाला असून एक हत्ती गंभीर जखमी अवस्थेत आढळला आहे. अपघाताची तीव्रता इतकी मोठी होती की ट्रेनचे इंजिन आणि पाच डबे रुळावरून घसरले. हा अपघात जमुनामुख आणि कामपूर स्थानकांदरम्यान घडला.

# २३ पालिका, पंचायतीसाठी शांततेत मतदान

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २० :** राज्यातील २३ नगरपरिषदा आणि नगरपंचायतींसह विविध जिल्ह्यातील एकूण १४३ सदस्य पदांसाठी आज मतदान झाले. राज्यातील नगरपरिषदा व नगरपंचायतीच्या निवडणुका २ डिसेंबर रोजी पार पडल्या होत्या मात्र २३ नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या निवडणुका पुढील ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

अंबरनाथ, कोपरगाव, देवळाली प्रवरा, पाथर्डी, नेवासा बारामती यासह २३ नगरपरिषदांमध्ये आज मतदान झाले. मतदारांचा सकाळपासून उत्साह दिसून आला. मात्र मतदान होत असलेल्या काही ठिकाणी गैरप्रकार झाल्याने मतदानाला गालबोट लागल्याचे दिसून आलं. राज्यातील २३ नगर परिषदा व नगर पंचायतींच्या अध्यक्ष आणि १४३ सदस्यपदांसाठी आज २० डिसेंबर रोजी मतदान झाले.

यात मराठवाड्यातील फुलंब्री (जि. संभाजीनगर), वसमत (जि. हिंगोली), धमार्बाद व मुखेड (जि. नांदेड), रेणापूर, निलंगा (जि. लातूर) या ६ पालिकांसह अन्य १७ पालिकांच्या ३८ प्रभागांचा समावेश आहे. या ठिकाणी रविवार २१ डिसेंबर रोजी मतमोजणी होऊन निकाल घोषित होईल.

अंबरनाथ मध्ये २०८ संशयित मतदारांना पोलिसांनी ताब्यात घेतलं असून त्या सर्वांचे आधार कार्ड व पॅन कार्ड द्वारे सखोल तपासणी करण्यात आली. संशयित बोगस मतदारांमुळे गोंधळ उडाला.

नांदेड जिल्ह्यातील धमार्बाद मध्ये मतदारांना डांबून ठेवल्याचा आरोप मतदारांकडून होत आहे.



> **बोगस मतदार**
> नाशिक जिल्ह्यातील सिन्नर नगरपरिषद निवडणुकीत प्रभाग क्रमांक २ मधील मतदान केंद्रावर बोगस मतदार पकडल्याची घटना उघडकीस आली. बनावट आधार कार्डच्या आधारे एक तरुण आपल्या भावाच्या जागेवर मतदान करण्यासाठी आला होता. निवडणूक अधिकाऱ्यांनी संबंधित व्यक्तीला ताब्यात घेऊन पोलिसांच्या स्वाधीन केले आहे. या घटनेमुळे काही काळासाठी मतदान प्रक्रिया थांबवण्यात आली होती.

> कोपरगाव नगरपरिषदेसाठीच्या मतदान प्रक्रियेदरम्यान शहरातील एस. जी. महाविद्यालयातील मतदान केंद्रावर मोठा गोंधळ उडाला. भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांच्या समर्थकांमध्ये जोरदार शाब्दिक वाद झाला. मतदारांवर उमेदवारांचे प्रतिनिधी दबाव टाकत असल्याचा आरोप दोन्ही बाजूंनी करण्यात आला.
> आरोप-प्रत्यारोपांमुळे वातावरण तापले असताना पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप केला. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी पोलिसांनी दोन्ही गटांच्या कार्यकर्त्यांना मतदान केंद्राच्या परिसरातून दूर हटवले.

# अवादा प्रकल्प दुर्घटना चौकशी टीम दाखल



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :** विस्तारित बुटीबोरी औद्योगिक वसाहत परिसरातल्या अवादा सौर पॅनल कंपनीत शुक्रवारी सकाळी पाणी साठवण्याचा एक मोठा मनोरा कोसळून झालेल्या अपघातात ६ कामगारांचा टाक्याखाली दबून मृत्यू झाला.

या अपघातात आणखी ९ कामगार जखमी झाले असून त्यांच्यावर वर्धा मार्गावरच्या खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान घटनेची सखोल चौकशी करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाच्या सुरक्षा आणि आरोग्य संचालनालयाच्या सात अधिकाऱ्यांची टीम घटनास्थळी दाखल झाली आहे.

पाण्याची टाकी नेमकी कशामुळे कोसळली, तिच्यात गळती तर झाली नव्हती ना, सुरक्षा मानकांचे उल्लंघन तर झाले नव्हते ना याची सविस्तर पाहणी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाचे पथक करत आहे. निमार्णाधीन प्रकल्पात झालेला १२२५ किलो लीटरची (१२ लाख २५ हजार लिटर) क्षमता असलेली टाकी कोसळून झालेला हा अपघात दुर्मिळ घटना समजली जात आहे. त्यामुळे सर्व बाजूंनी शक्यता तपासली जात आहे.

पाण्याची जी टाकी कोसळून त्याखाली कामगार दबले गेले, त्या टाकीच्या चबूतऱ्याची देखील पाहणी केली जात आहे. सोबतच पाण्याच्या टाकीच्या धातूचे नमुनेही गोळा केले जात आहेत. सखोल तपासणीनंतरच यावर स्पष्टिकरण देता येईल. त्यामुळे तुर्तास अधिकाऱ्यांची टीम पाहणी करत आहे, असे अधिकारी माधव रत्नपारखी यांनी स्पष्ट केले.

प्रकाश नुल्ला साहणी (२४) रा. गवसरा, मुजफ्फरपूर, बिहार, अन्वर बशीर अंसारी (४९) रा. राम रहिम नगर, मध्य प्रदेश, मुख्यात इसका अंसारी (४३) रा. सेमरा गोपालगंज, बिहार या तिघांना गंभीर दुखापती झाल्या आहेत. बहुतेक सर्व जखमी बिहार आणि युपीचे आहेत.

# कंबोडियात माझ्यासह ६ भारतीयांची किडनी काढली

## चंद्रपूरच्या पीडित शेतकऱ्याचा दावा : आंतरराष्ट्रीय रॅकेटचा संशय : एसआयटी स्थापन

■ **प्रवीण बत्की, चंद्रपूर, दि. २० :** सावकारी पाशात अडकून चंद्रपूरच्या एका शेतकऱ्याला कंबोडियात जाऊन किडनी विकावी लागल्याच्या प्रकरणाने आता भयानक वळण घेतले आहे.

पीडित शेतकरी रोशन कुडे यांनी एक खळबळजनक दावा केला असून, कंबोडियात माझ्यासोबत आणखी ६ भारतीय तरुणांची देखील किडनी काढण्यात आली, असे शेतकऱ्याने सांगितले. शेतकऱ्याच्या दाव्यामुळे हे केवळ स्थानिक सावकारी प्रकरण नसून, यामागे मोठे आंतरराष्ट्रीय अवयव तस्करीचे रॅकेट सक्रिय असल्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एसआयटीची स्थापना करण्यात आली आहे.



नागभीड तालुक्यातील मिंथुर येथील रोशन कुडे यांनी आपल्यावर ओढवलेल्या प्रसंगाची आपबीती सांगितली. त्यांच्या माहितीनुसार, कंबोडियातील रुग्णालयात किडनी काढण्यासाठी नेण्यात आलेल्या लोकांमध्ये त्यांच्यासोबत राजस्थान, पंजाब, हरियाणा, बिहार आणि उत्तर प्रदेश येथील तरुणांचा समावेश होता. विशेष बाब म्हणजे, या गटासोबत असलेला नाशिकचा एक तरुण विमानतळावरूनच पळून जाण्यात यशस्वी झाला, अशी माहिती कुडे यांनी दिली. यामुळे या रॅकेटची व्याप्ती देशभर पसरली असल्याचा संशय बळावला आहे.

# मुंबईच्या विमानतळावर ७८५ कोटींचे सोने जप्त

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :** देशात विमान प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या सातत्याने वाढत असताना, त्याचबरोबर सोन्याच्या तस्करीच्या घटनांमध्येही लक्षणीय वाढ होत असल्याचे समोर आले आहे.

महसूल गुप्तचर संचालनालयाने (डीआरआय) तयार केलेल्या ताज्या अहवालानुसार, आर्थिक वर्ष २०२४-२५ दरम्यान मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून तब्बल ७८५ कोटी रुपयांचे, एक हजारांहून अधिक प्रकरणांतील सोने जप्त करण्यात आले आहे. या आकडेवारीमुळे मुंबई विमानतळ देशातील सोन्याच्या तस्करीसाठी सर्वात मोठे हॉटस्पॉट ठरले आहे. दरम्यान, या प्रकरणाची कसून चौकशी केली जात असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.






## कोयना जलविद्युत प्रकल्पातील गळतीमुळे

# ६०० मेगावॅट वीज निर्मिती तीन महिने बंद

■ महासागर प्रतिनिधी
सातारा, दि. २० :

कोयना धरणातून पोफळी येथील जलविद्युत केंद्राला पाणीपुरवठा करणाऱ्या आपत्कालीन बोगद्याला लागलेली गळती अखेर काढण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. या दुरुस्ती कामासाठी गुरुवारपासून कोयना जलविद्युत प्रकल्पाचा टप्पा एक आणि दोन पूर्णतः बंद करण्यात आला असून, पुढील तीन महिने हे दोन्ही टप्पे बंद राहणार आहेत. परिणामी राज्याच्या महानिर्मितीच्या कोट्यातील सुमारे ६०० मेगावॅट वीज निर्मिती तात्पुरती बंद राहणार आहे.



१९६२ साली कार्यान्वित झालेला कोयना जलविद्युत प्रकल्प हा राज्यातीलच नव्हे तर देशातील महत्त्वाच्या प्रकल्पांपैकी एक आहे. एकूण १,९२० मेगावॅट क्षमतेच्या या प्रकल्पात चार टप्प्यांमध्ये वीज निर्मिती केली जाते. पहिल्या टप्प्यात प्रत्येकी ७० मेगावॅट क्षमतेची चार युनिट असून त्यातून २८० मेगावॅट वीज निर्मिती होते, तर दुसऱ्या टप्प्यात प्रत्येकी ८० मेगावॅट क्षमतेची चार युनिट असून त्यातून ३२० मेगावॅट वीज उपलब्ध होते. हे दोन्ही टप्पे एकाच भूमिगत पॉवरहाऊसमध्ये कार्यरत असून त्याठिकाणी पेल्टन टर्बाइनच्या साहाय्याने एकूण ६०० मेगावॅट वीज निर्मिती केली जाते.

कोयना धरणातील पाणी हेड रेस टनेलद्वारे पोफळी येथील पॉवरहाऊसमध्ये आणले जाते. येथे वीज निर्मितीनंतर ते पाणी टेल रेस टनेलद्वारे कोळकेवाडी धरणात सोडले जाते. मात्र, कोयना धरणातून पोफळीच्या वीज निर्मिती संचाला पाणी पुरवठा करणाऱ्या आपत्कालीन बोगद्याला गळती लागल्याने सह्याद्रीच्या डोंगरातून धबधब्यासारखे पाणी वाहत आहे. ही गळती गंभीर स्वरूपाची असल्याने दुरुस्ती कामासाठी टप्पा एक व दोन बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

विशेष म्हणजे हे काम मागील सहा वर्षांपासून रखडले होते. अखेर आता पुणे येथील एका खासगी एजन्सीला दुरुस्तीचे काम देण्यात आले असून प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली आहे. गळती पूर्णपणे थांबवली जाईपर्यंत आणि बोगद्याची सुरक्षितता सुनिश्चित होईपर्यंत हे दोन टप्पे बंद ठेवावे लागणार असल्याचे प्रकल्प प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.दरम्यान, राज्यात सध्या वीजेची मागणी सुमारे २५ हजार १८ मेगावॅटपर्यंत पोहोचली आहे. महानिर्मिती कंपनी, खासगी वीज उत्पादक आणि केंद्र सरकारच्या माध्यमातून ही मागणी भागवली जाते. मात्र, कोयना प्रकल्पातील ६०० मेगावॅट वीज निर्मिती बंद राहिल्याने राज्य सरकारला पर्यायी वीज व्यवस्थेचा आधार घ्यावा लागणार आहे.याबाबत माहिती देताना पोफळीचे मुख्य अभियंता संजय चौपडे यांनी सांगितले की, आपत्कालीन बोगद्याला लागलेली गळती काढण्यासाठी प्रकल्पाचे दोन टप्पे बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. गुरुवारपासून शटडाऊन घेण्यात आला असून, या कालावधीत ६०० मेगावॅटची तूट भासणार आहे. या गैरसोयीवर उपाययोजना करण्याच्या सूचना वरिष्ठ कार्यालयाला देण्यात आल्या असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# भाजप उमेदवाराचा ठाकरेंच्या उमेदवारावर चाकू हल्ला

■ महासागर प्रतिनिधी
वाशिम, दि. २० :

वाशिम येथील भाजपच्या एका उमेदवाराकडून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उमेदवारावर चाकू हल्ल्याचा प्रयत्न झाल्याची गंभीर घटना समोर आली आहे. या घटनेमुळे शहरात तणाव निर्माण झाला असून, भाजप उमेदवाराविरोधात पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वाशिम जिल्ह्यातील लाखाळा परिसरात शुक्रवारी मध्यरात्री 1.30 च्या सुमारास ही घटना घडली आहे. ठाकरे गटाचे उमेदवार गुड्डू उर्फ प्रवीण डोळे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, भाजप उमेदवार सतीश उर्फ गल्ला वानखेडे यांनी निवडणुकीच्या कारणावरून त्यांच्याशी वाद घातला. तसेच त्यांना जीवे मारण्याची धमकीही दिली. प्रवीण डोळे हे आपल्या मित्रांसोबत चर्चा करत होते. त्यावेळी सतीश वानखेडे तिथे आले. यावेळी निवडणूक व मतदानाच्या मुद्यावरून त्यांच्यात वाद झाला. हा वाद वाढल्यानंतर वानखडे यांनी डोळे यांच्यावर चाकूने हल्ला करण्याचा प्रयत्न केला.

तसेच गोळ्या घालून ठार मारण्याची धमकीही दिली. वानखेडे व त्यांच्या समर्थकांनी यावेळी डोळे यांच्यासोबत असलेल्या त्यांच्या मित्रांनाही मारहाण केली. या घटनेनंतर वाशिम शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. त्यानुसार, सतीश उर्फ गल्ला वानखेडे याच्याविरोधात मारहाण, धमकी व हल्ल्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आपल्याविरोधात गुन्हा दाखल झाल्याची माहिती मिळताच सतीश वानखेडे हा फरार झाला आहे. वाशिम पोलिस त्याचा शोध घेत आहेत. दरम्यान, या घटनेमळे वाशिम शहर व परिसरात वातावरण तापले असून, निवडणूक काळात घडलेल्या या घटनेवर तीव्र चिंता व्यक्त केली जात आहे. पण ठाकरे गटाने मतदारांना कोणत्याही दबावाला व धमक्यांना बळी न पडता निर्भयपणे मतदान करण्याचे आवाहन केले.

# अंबरनाथमध्ये २०८ बोगस मतदारांचा शिरकाव

■ महासागर प्रतिनिधी, अंबरनाथ, दि. २० :

अंबरनाथमध्ये नगरपरिषदेच्या निवडणुकीदरम्यान धक्कादायक घटना घडली आहे. कोहोजगाव परिसरात एका सभागृहात मोठ्या प्रमाणात महिला आणि पुरुष जमा झाले होते, ज्यांच्यावर बोगस मतदान करण्याचा आरोप करण्यात आला आहे. या संदर्भात भाजप आणि काँग्रेस कार्यकर्त्यांनी घटनास्थळी पोहोचून हंगामा सुरू केला. पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करून सभागृहातील लोकांना बाहेर काढले. माहिती मिळाल्याप्रमाणे, एकूण २०८ महिला आणि मुलं या ठिकाणी जमा झाली होत्या आणि सर्व लोक भिवंडी येथून आले होते. या लोकांचा या ठिकाणी उपस्थित राहण्याचा नेमका हेतू काय होता, याची चौकशी सुरू आहे. अंबरनाथ पोलिसांनी फिरती पथकाकडून तपास सुरू केला असून लवकरच अधिक माहिती समोर येईल अशी माहिती दिली आहे.

या पार्श्वभूमीवर, अंबरनाथ नगरपालिकेसाठी मतदान सुरू असताना शहरातील प्रभाग क्रमांक २८ मध्ये दोन जणांना पैसे वाटप करताना रंगेहाथ पकडले गेले. या प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी ही व्यक्ती भरारी पथकाच्या ताब्यात दिली. भाजपच्या उमेदवाराकडून पैसे वाटप केल्याचा आरोप या घटनेत करण्यात आला आहे. पोलिस घटनास्थळी दाखल झाले असून या प्रकरणाची पुढील कारवाई सुरू आहे. या सर्व घटनांमुळे अंबरनाथमध्ये निवडणूक काळातच वातावरण तणावपूर्ण झाले आहे, आणि या बोगस मतदानासंदर्भातील प्रकरणाने स्थानिक राजकीय वादांना नवीन वळण दिले आहे.

# महावितरण वीज कर्मचाऱ्यांना अत्याधुनिक सुरक्षा साधने देणार : राजेंद्र पवार

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. २० :

वीज कर्मचारी हा महावितरणचा आधारस्तंभ आहे. तो सुरक्षित असेल तरच अखंडित वीजपुरवठा मिळणार आहे. त्यामुळे वीज कर्मचाऱ्यांच्या जिविताची सुरक्षा सर्वाधिक प्राधान्याचे आहे. व त्यासाठी महावितरण कंपनी अत्याधुनिक सुरक्षा साधने खरेदी करणार असल्याचे प्रतिपादन महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी पुणे येथे केले.



महावितरणच्या सांघिक कार्यालयातर्फे पुणे परिमंडल येथे १८ व १९ डिसेंबरला अत्याधुनिक सुरक्षा साधनांच्या प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते. पहिल्या दिवशी कंपनीत कार्यरत असलेल्या प्रमुख औद्योगिक संघटनांच्या शिखर पदाधिकारी, व्यवस्थापनातील वरिष्ठ अभियंते व अधिकारी यांच्यापुढे रास्तापेठ उपकेंद्रात तर दुसऱ्या दिवशी (दि.१९) पद्मावती येथील २२/११ केव्ही उपकेंद्रात परिमंडलातील अभियंते व वीज कर्मचाऱ्यांपुढे सुरक्षा साधनांचे प्रात्यक्षिक करण्यात आले. यावेळी प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे, मुख्य अभियंता सुनिल काकडे, सहमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी ललित गायकवाड यांचेसह वरिष्ठ अधिकारी व वीज कर्मचाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. याप्रसंगी मार्गदर्शन करताना संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार म्हणाले, ग्राहकांना अखंडित व गुणवत्तापूर्ण वीजपुरवठा करणे हे महावितरणचे कर्तव्य आहे. वीजपुरवठा अखंडित देण्यासाठी यापुढे बिघाड होणार नाहीत, झाल्यास त्याचा कालावधी कमीत कमी असेल, यावर काम करावे लागेल. बाजारात संभाव्य बिघाड ओळखण्याचे नवनवीन तंत्रज्ञान उपलब्ध आहे. मात्र बाजारातील अत्याधुनिक तंत्रज्ञान व साधन सामुग्री आपल्या यंत्रणेला पुरक आहे का? तसेच त्यात काय बदल करावे लागतील याची माहिती देण्यासाठी या प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले आहे. वीज कर्मचाऱ्यांच्या अभिप्रायावर व साधनांच्या उपयोगितेवरच ही साधने खरेदी केली जातील अशी ग्वाही त्यांनी दिली.

# खुर्चीच हवी असती तर भाजपसोबत गेलो असतो : आदित्य ठाकरे

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. २० :

"आम्हाला जर फक्त खुर्चीची आणि सत्तेची चिंता असती, तर आम्ही केव्हाच भाजपसोबत गेलो असतो. पण आमचे राजकारण मूल्यांवर आधारित आहे, सत्ताकेंद्रित नाही. भाजपसोबत तडजोड करून सत्तेत बसण्यापेक्षा, लोकांसाठी आणि शहरांच्या हितासाठी भूमिका घेणं आम्हाला अधिक महत्त्वाचं वाटतं," अशा शब्दांत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आणि युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांनी सत्ताधाऱ्यांवर कडाडून हल्ला चढवला. पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी शहरातील वाहतूक कोंडी, पर्यावरणाचा ऱ्हास आणि बिघडलेल्या कायदा-सुव्यवस्थेचा पाढाच वाचला.

आदित्य ठाकरे यांनी भाजपच्या कार्यपद्धतीवर टीका करताना म्हटले की, "देशातील एक तरी असे शहर दाखवा जे भाजपशासित आहे आणि जिथे खरोखर सुधारणा झाली आहे.

ज्या शहरांत किंवा राज्यांत भाजप सत्तेत आली, तिथे प्रगतीऐवजी उलट दिशेने प्रवास सुरू झाला आहे. प्रत्यक्ष जमिनीवर काम करण्याऐवजी दुसऱ्यांनी केलेल्या कामांची नावे बदलणे



किंवा समाजात फूट पाडणे, हीच यांची राजकीय पॉलिसी आहे."

# भाजप-राष्ट्रवादी समर्थक मतदान केंद्रावर आमने-सामने

■ महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. २० :

कोपरगाव नगरपरिषद निवडणुकीसाठी सुरू असलेल्या मतदान प्रक्रियेदरम्यान शहरातील एस. जी. महाविद्यालयातील मतदान केंद्रावर मोठा गोंधळ उडाल्याची घटना समोर आली आहे. सकाळपासून शांततेत सुरू असलेल्या मतदानाला दुपारच्या सुमारास अचानक तणावाचे वळण लागले. भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांच्या समर्थकांमध्ये जोरदार शाब्दिक वाद झाला. मतदारांवर उमेदवारांचे प्रतिनिधी दबाव टाकत असल्याचा आरोप दोन्ही बाजूंनी करण्यात आला. मतदान केंद्राच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर कार्यकर्त्यांची गर्दी जमल्याने परिस्थिती अधिक चिघळली आणि काही काळासाठी तणावाचे वातावरण निर्माण झाले.

हा वाद पोलिसांच्या उपस्थितीतच उफाळून आला. मतदान केंद्राच्या प्रवेशद्वाराजवळ दोन्ही गटांचे कार्यकर्ते आमने-सामने आल्याने परिस्थिती हाताबाहेर जाण्याची शक्यता निर्माण झाली होती. आरोप-प्रत्यारोपांमुळे वातावरण तापले असताना पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप केला. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी पोलिसांनी दोन्ही गटांच्या कार्यकर्त्यांना मतदान केंद्राच्या परिसरातून दूर हटवले. या कारवाईदरम्यान काही मतदार प्रतिनिधी आणि पोलिसांमध्येही शाब्दिक चकमक झाल्याचे पाहायला मिळाले. मात्र, पोलिसांनी संयम राखत परिस्थिती नियंत्रणात आणली.

या घटनेनंतर एस. जी. महाविद्यालयातील मतदान केंद्रावर काही काळ मतदानाचा वेग मंदावला. पोलिसांनी परिसरात अतिरिक्त बंदोबस्त तैनात करत कोणत्याही अनुचित



प्रकारास आळा घालण्याचे प्रयत्न सुरू केले.

मतदान केंद्राच्या बाहेर पोलिसांचा कडक पहारा ठेवण्यात आला असून, केवळ अधिकृत ओळखपत्र असलेल्या व्यक्तींनाच आत प्रवेश देण्यात येत आहे. दुपारनंतर मात्र मतदारांची गर्दी पुन्हा वाढताना दिसून आली. मिळालेल्या माहितीनुसार, सकाळी साडेअकरा वाजेपर्यंत सुमारे 18 टक्के मतदान झाले होते. थंडीमुळे सकाळी मतदानाचा वेग काहीसा कमी असला, तरी दुपारच्या सत्रात नागरिकांचा प्रतिसाद वाढल्याचे चित्र दिसून आले.

कोपरगाव नगरपरिषद निवडणूक ही पारंपरिकदृष्ट्या काळे आणि कोल्हे या दोन राजकीय गटांच्या वर्चस्वाची मानली जाते. या पार्श्वभूमीवर यंदाची निवडणूक अत्यंत चुरशीची ठरली आहे. सकाळपासून मतदान केंद्रांवर दोन्ही गटांचे कार्यकर्ते सक्रिय होते.

यामुळेच वादाला तोंड फुटल्याचे बोलले जात आहे. स्थानिक राजकारणातील या संघर्षामुळे मतदान प्रक्रियेवर परिणाम होऊ नये, यासाठी प्रशासनाकडून विशेष दक्षता घेतली जात आहे.

# बहुजन विकास आघाडीमध्ये प्रचंड संभ्रमावस्था

■ दीपक मोहिते, पालघर, दि. २० :

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांच्या सध्या मुलाखती सुरू आहेत.जवळपास ८० % मुलाखती पूर्ण झाल्या असून उर्वरित मुलाखती लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या प्रयत्नात सर्वच राजकीय पक्ष आहेत.

मात्र, महायुती व महाविकास आघाडी,या दोघांमध्ये जागावाटपाचा तिढा काही सुटलेला नाही. शिवसेनेचे ( उबाठा ) यांचे एक शिष्टमंडळ माजी आ.हितेंद्र ठाकूर यांची भेट घेऊन गेले.तर दुसरीकडे भाजप व शिवसेना ( शिंदे गट ) या दोघांमध्ये जागावाटपावरून चांगलीच रस्सीखेच सुरू झाली आहे.हे दोन्ही पक्ष महायुतीमधील तिसरा घटक पक्ष असलेल्या अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला काडीचीही किंमत देत नसल्याचे दिसून आले आहे.



वसई विरार भागात अजित पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाचे अस्तित्व अत्यंत नगण्य असल्यामुळे त्यांना दोन ते चार जागा मिळतील, असा अंदाज आहे. या मिळालेल्या तुटपुंज्या जागा देखील राष्ट्रवादी काँग्रेसला जिंकता येणार नाहीत. एकनाथ शिंदे गट मात्र नालासोपारा व वसई या दोन शहरात पाच ते सहा जागांवर बहुजन विकास आघाडीला बऱ्यापैकी टक्कर देईल,असा अंदाज आहे. उर्वरित सर्व जागांवर भाजप व

बहुजन विकास आघाडी या दोन पक्षात तुंबळ लढत होईल असा अंदाज आहे.वसईच्या आ.स्नेहा दुबे पंडित यांनी " महानगरपालिका निवडणूक कठीण असली तरी ती जिंकणे आमच्यासाठी अशक्य नाही.आम्हीच बाजी मारणार असल्याचे त्यांनी नुकतेच माध्यमांना सांगितले. दरम्यान बहुजन विकास आघाडीचे माजी आ.हितेंद्र ठाकूर यांनी या निवडणुकीत आमचाच महापौर बसणार,असे सांगत कार्यकर्त्यांच्या शरीरात प्राण ओतायचा प्रयत्न केला आहे.

पण त्याच सुमारास आघाडीचे अनेक नेते भाजपच्या वाटेवर असल्याचे स्पष्ट होत आहे. त्यांच्या पक्षाचे क्रमांक दोनचे नेते राजीव पाटील हे लवकरच भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याच्या वावड्या सतत उठत आहेत.पण,त्यांचा प्रवेश होण्यापूर्वी त्यांचे अनेक समर्थक दररोज भाजपमध्ये सामील होऊ लागले आहेत.

त्यामुळे नालासोपारा शहरात बहुजन विकास आघाडीला चांगलीच गळती लागल्याचे दिसून आले आहे.माजी महापौर असलेले राजीव पाटील हे गेल्या वर्षभरापासून पक्षाच्या कामकाजापासून काहीसे दूरच आहेत. त्यांचे पक्षकार्यापासून लांब राहण्यामुळे आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते हे सारे संभ्रमावस्थेत सापडले आहेत. वास्तविक हितेंद्र ठाकूर व राजीव पाटील यांनी या ज्वलंत विषयी आपली भूमिका स्पष्टपणे जाहीर करण्याची गरज होती.दुसरीकडे भाजप देखील या विषयी दररोज बातम्या पेरण्याचे काम करत आहे. राजीव पाटील यांचे कट्टर समर्थक अशी ओळख असलेले माजी नगरसेवक प्रफुल्ल साने यांच्या नावाचीही चर्चा जोरात सुरू झाली आहे. विरार येथे गेल्या जुलै महिन्यात कोसळलेल्या इमारतीच्या प्रकरणात त्यांचा एक नातेवाईक सध्या अटकेत आहे. या अशा सर्व वातावरणामुळे बहुजन विकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये काहीशी संभ्रमावस्था निर्माण झाली आहे.

## पुण्यात दोन्ही राष्ट्रवादींसह उद्धव ठाकरेंना धक्का

# माजी नगरसेवकांनी हाती घेतले कमळ

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २० :

आगामी महानगरपालिका निवडणुकांचे पडघम वाजू लागताच राजकीय आखाड्यात मोठे भूकंप होण्यास सुरुवात झाली आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील राजकीय समीकरणे बदलणारी मोठी घडामोड आज मुंबईत पार पडली. भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे आणि केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या उपस्थितीत पुणे आणि पिंपरीतील दोन्ही राष्ट्रवादी आणि ठाकरे गटातील अनेक बड्या नेत्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. विशेष म्हणजे, वडगाव शेरीचे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार बापूसाहेब पठारे यांचे पुत्र सुरेंद्र पठारे यांनी पुन्हा भाजपचा झेंडा हाती घेतल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. दुसरीकडे, अजित पवारांच्या बालेकिल्ल्यात म्हणजेच पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपला मोठे यश मिळाले असून, अजित पवार गटाला मोठे खिंडार पडले आहे.



विधानसभा निवडणुकीत बापूसाहेब पठारे यांनी भाजप सोडून शरद पवार गटाची 'तुतारी' हाती घेतली आणि विजय मिळवला. मात्र, अवघ्या काही महिन्यांतच त्यांचे पुत्र सुरेंद्र पठारे यांनी पुन्हा भाजपमध्ये प्रवेश केला आहे. बापूसाहेब पठारे यांनी भाजप सोडताना तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची परवानगी घेतली होती, असे बोलले जाते. आता फडणवीसांच्याच सूचनेनुसार सुरेंद्र पठारे घरवापसी करत असल्याने पठारे कुटुंबाने एकाच वेळी दोन्ही प्रमुख पक्षांशी 'नाळ' जुळवून ठेवल्याची चर्चा रंगली आहे. सुरेंद्र यांच्यासोबतच पुण्यातील माजी नगरसेवक विकास दांगट, सायली वांजळे आणि बाळा धनकवडे यांनीही भाजपमध्ये प्रवेश केल्याने पुण्यात भाजपची ताकद वाढली आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेत पुन्हा सत्ता मिळवण्यासाठी भाजपने आक्रमक रणनीती आखली आहे. आजच्या प्रवेश सोहळ्यात अजित पवार गटाचे तब्बल 8 आणि इतर पक्षांचे 7 अशा 15 बड्या नेत्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. यात माजी स्थायी समिती अध्यक्ष प्रशांत शितोळे, नवनाथ जगताप, माजी उपमहापौर प्रभाकर वाघेरे, राजू मिसाळ आणि माजी महापौर मंगला कदम यांचे पुत्र कुशाग्र कदम यांचा समावेश आहे.

# मेंदूमृत रूग्णाच्या अवयवदानातून दोघांना मिळाले जीवनदान

■ महासागर प्रतिनिधी
सांगली, दि. २० :

मृत्यू हे अंतिम सत्य आहे असे मानले जाते. पण, वैज्ञानिक क्रांतीमुळे मरावे परी अवयवरूपी उरावे, याचा हृदयस्पर्शी प्रत्यय सांगलीत आला. कुटुंबियांच्या संवेदनशील निर्णयामुळे दिवंगत दीपक आप्पासाहेब धर्माधिकारी यांचे यकृत व मूत्रपिंड नाशिक येथील दोन रुग्णांसाठी जीवनरक्षक ठरले आहे. जिल्हा प्रशासन, पोलीस आणि आरोग्य यंत्रणेच्या संवेदनशील व तत्पर समन्वयातून यकृत अवघ्या 25 मिनिटात कोल्हापूरला आणि तिथून विशेष विमानाने अवघ्या दीड तासात नाशिकला पोहोचले तर मूत्रपिंड ग्रीन कॉरिडॉरद्वारे रूग्णवाहिकेतून नाशिकला रवाना झाले.

सांगलीतील हरिपूर येथील रहिवासी, 69 वर्षीय दीपक आप्पासाहेब धर्माधिकारी यांना मेंदूमध्ये झालेल्या तीव्र रक्तस्त्रावामुळे मंगळवारी, दि. 16 डिसेंबर रोजी उषःकाल रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. डॉक्टरांचे प्रयत्न सुरू असतानाच त्यांचा मेंदू मृत झाल्याचे स्पष्ट झाले. अशा दुःखद क्षणीही त्यांच्या कुटुंबियांनी स्वतःच्या दुःखावेगाला आवर घालत अवयवदानाचा घेतलेला निर्णय मानवतेला उंचावणारा ठरला. पत्नी दीपा, कन्या डॉ. श्रेया आणि चिरंजीव अभिनंदन धर्माधिकारी यांनी इतर कुटुंबियांच्या सहमतीने



अवयवदानाचा निर्णय घेत, दीपक धर्माधिकारी यांना मृत्यूनंतरही अवयवरूपी जिवंत ठेवण्याचा मार्ग निवडला. त्यानुसार दिवंगत दीपक धर्माधिकारी यांचे यकृत, दोन्ही मूत्रपिंडे, दोन डोळे आणि त्वचा दान करण्यात आली. या निर्णयाची माहिती जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. विक्रमसिंह कदम यांना रूग्णालय प्रशासनाने दिली. अवयवदानाच्या प्रक्रियेत वेळ खूप महत्त्वाचा असतो. हे लक्षात घेऊन रूग्णालय प्रशासनाच्या विनंतीवर जिल्हाधिकारी अशोक काकडे, पोलीस अधीक्षक संदीप घुगे आणि जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. विक्रमसिंह कदम यांनी तत्परतेने आवश्यक परवानग्या, सुरक्षा व्यवस्था व वाहतूक नियोजनासाठी आवश्यक त्या उपाययोजना करत आवश्यक प्रशासकीय पाठबळ दिले.

यासंदर्भात दीपक धर्माधिकारी यांना श्रद्धांजली वाहून जिल्हाधिकारी अशोक काकडे म्हणाले, मानवता एक आहे, आपल्यात कसलाही भेद नाही, अवयवदानाने आपल्या व्यक्तिंना अजरामर करावे. मृत्युनंतरही मृत व्यक्ति कुठल्या तरी व्यक्तिमध्ये अवयवाच्या रूपाने जिवंत राहणार आहे आणि त्याचे आशीर्वाद आपल्या कुटुंबाला लाभणार आहेत, असे सांगून त्यांनी दीपक धर्माधिकारी यांचे यकृत, दोन्ही मूत्रपिंडे, दोन डोळे आणि त्वचा या अवयवांचे दान करण्याचा निर्णय अवयवदानाच्या चळवळीला बळ देणारा आहे. यामुळे अवयवदानाबद्दल समाजात अधिक जनजागृती होईल, असा विश्वास व्यक्त केला. नाशिक येथील अशोका मेडिकव्हर रुग्णालयातील डॉक्टराची टीम शुक्रवारी सकाळी सांगलीला दाखल झाली. त्यांनी जवळपास दोन तासात संबंधिताचे अवयव सुस्थितीत काढण्याची प्रक्रिया पूर्ण केली. त्यानंतर या रूग्णालयातून नाशिक येथे पोहोचवण्यासाठी यकृत नेण्यासाठी विशेष विमान व मूत्रपिंड पाठवण्यासाठी ग्रीन कॉरिडॉर करण्यात आला. ग्रीन कॉरिडॉरमुळे सांगलीतून रूग्णवाहिकेने अवघ्या 25 मिनिटात कोल्हापुरात आणि तेथून विशेष विमानाने अवघ्या दीड तासात यकृत नाशिकला नेण्यात आले. ग्रीन कॉरिडॉरमुळे अवयवदानातील यकृत व मूत्रपिंड नाशिक येथील रुग्णालयात विनाअडथळा व गतीने नेण्यासाठी मोठी मदत झाली. दिवंगत दीपक धर्माधिकारी यांच्या दुसऱ्या मूत्रपिंडाचे उषःकाल रूग्णालयातीलच दुसऱ्या एका रूग्णास प्रत्यारोपण करण्यात आले. तसेच, डोळ्यांचा कॉर्निया अनुराधा आय हॉस्पिटल आणि त्वचा सुश्रुत प्लास्टीक सर्जरी हॉस्पिटल येथे नेण्यात आले असून आवश्यकतेनुसार प्रत्यारोपण करण्यात येणार आहे.

या महत्त्वपूर्ण आणि जीवनदायी ठरणाऱ्या उपक्रमात उषःकाल रूग्णालयाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. मिलिंद पारीख, डॉ. मकरंद खोचीकर, डॉ. आनंद मालाणी, डॉ. बिपीन मुंजाप्पा यांच्यासह वैद्यकीय पथकाच्या अचूक व वेगवान समन्वयाने हे काम तांत्रिकदृष्ट्या यशस्वी झाले. दोन व्यक्तिंना जीवनदान देण्यासाठी सहकार्य केल्याबद्दल उषःकाल रूग्णालय व्यवस्थापनाने जिल्हा प्रशासन, जिल्हा पोलीस प्रशासन व आरोग्य यंत्रणेचे आभार व्यक्त केले.

# राज्यात सिकलसेल दुरीकरणासाठी विशेष मोहीम
## २१ जिल्ह्यांत १०० टक्के तपासणीचे उद्दिष्ट

**अकोला,दि २० (प्रतिनिधी) :** राज्यात सिकलसेल आजाराचे दुरीकरण करण्याचा संकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस व आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या संकल्पनेतून ठरविण्यात आला आहे. त्यानुसार विदर्भासह सिकलसेल आजाराचा प्रादुर्भाव असलेल्या राज्यातील २१ जिल्ह्यांत विशेष सिकलसेल दुरीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे.या मोहिमेचे नियोजन १८ डिसेंबर २०२५ ते १४ जानेवारी २०२६ या कालावधीत करून मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यात येणार असून, १५ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२६ दरम्यान प्रत्यक्ष मोहीम राबविली जाणार आहे. या काळात नागरिकांची १०० टक्के तपासणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

अकोला जिल्ह्यात जिल्हाधिकारी वर्षा मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, उपसंचालक आरोग्यसेवा डॉ. सुशील वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. आरती कुलवाल यांच्या नेतृत्वाखाली मोहिमेचे सखोल नियोजन करण्यात आले आहे.

### सिकलसेल आजार काय आहे?

**सिकलसेल हा अनुवांशिक रक्तविकार असून यात हिमोग्लोबिन 'एस' तयार होते. त्यामुळे लाल रक्तपेशी गोल न राहता चंद्रकोरीसारख्या (सिकल) होतात. अशा पेशी रक्तवाहिन्यांत अडथळा निर्माण करतात, ऑक्सिजनपुरवठा कमी होतो व वेदनादायक प्रसंग, अवयवांचे नुकसान यांसारख्या गुंतागुंती निर्माण होतात.लक्षणे व गुंतागुंत या आजारात तीव्र वेदनांचे झटके (सिकलसेल क्रायसिस), ॲनिमिया, वारंवार होणारे संक्रमण, हात–पायांना सूज, मुलांमध्ये वाढीचा विलंब, दृष्टी समस्या आदी लक्षणे दिसतात. योग्य उपचार न झाल्यास स्ट्रोक, मूत्रपिंड, यकृत, फुफ्फुसे व हृदयाचे नुकसान होऊ शकते.**

**घरोघरी जनजागृती व मोफत तपासणी**

या मोहिमेत आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी, समुदाय आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकारी घरोघरी जाऊन जनजागृती करतील. सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा, जिल्हा व महिला रुग्णालयांमध्ये सिकलसेल तपासणी केली जाणार आहे. बाधित रुग्णांना तात्काळ उपचार सुरू केले जातील. सध्या उपचार घेत असलेले तसेच नव्याने निदान होणारे सर्व रुग्ण उपचाराच्या कक्षेत येतील.यासोबतच विवाहपूर्व समुपदेशन, सिकलसेल रुग्णांसाठी असलेल्या शासकीय योजनांची माहिती व लाभ मिळवून देण्याचे मार्गदर्शन केले जाणार आहे.

शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, लोकप्रतिनिधी व शासकीय यंत्रणांच्या समन्वयातून ही मोहीम राबविण्यात येणार आहे.या मोहिमेत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून तपासणी करून घ्यावी.

# जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्याकडून विविध कृषी प्रकल्पांची पाहणी

**अकोला,दि २० (प्रतिनिधी) :** जिल्ह्यातील विविध कृषी प्रकल्प, कृषी योजनाधारित व्यवसाय प्रकल्प आदींची जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी गुरुवारी पाहणी केली.जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी कुंभारी येथे राज्य पुरस्कृत एकात्मिक सोयाबीन व इतर गळीतधान्य प्रकल्पाअंतर्गत शेत बांधावरील जैविक निविष्ठा प्रयोगशालेला भेट देऊन पाहणी केली.तसेच भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनाअंतर्गत फळबाग लागवडीची पाहणी केली. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शंकर किरवे, प्रकल्प संचालक आत्मा मुरली इंगळे, उप विभागीय कृषी अधिकारी विवेक बिऱ्हाडे, तालुका कृषी अधिकारी विलास वाशीमकर उपस्थित होते.जिल्ह्यातील मौजे वणी रंभापूर तालुका अकोला येथील बोदडे डेअरीला जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी भेट दिली. डेअरी चे व्यवस्थापक मयूर



बोदडे यांनी कृषि विभागामार्फत राबवल्या जाणाऱ्या प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेंतर्गत अर्ज लाभ घेतला असून स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा बोरगाव मंजू या बँकेमार्फत त्यांना अर्थसहाय्य देण्यात आले आहे, या योजनेंतर्गत त्यांना प्रकल्प खर्चाच्या ३५ टक्के अनुदान रक्कम ३ लक्ष ८५ हजार रु मिळाले आहे.दुग्ध प्रक्रिया उद्योगासाठी श्री. बोदडे यांनी आधुनिक मशिनरीज खरेदी केल्या असून सदर मशिनरीज च्या सहायाने ते त्यांच्या डेअरी मध्ये लस्सी, दही, पेढा, श्रीखंड इत्यादी दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन करतात, तसेच विशेष पॅकिंग मध्ये उत्पादित माल जिल्ह्यातील विविध ठिकाणी विक्री करतात. जिल्हाधिकारी यांनी उत्पादनाच्या ठिकाणाची, यंत्रसामुग्री तसेच उत्पादित मालाच्या गुणवत्तेची पाहणी केली.

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक – २०२५–२६

# लागणाऱ्या परवानगीसाठी मनपात एक खिडकी कार्यान्वीत

**अकोला,दि २० (प्रतिनिधी) :** अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीकरिता लागणारी सर्व परवानगी देण्याकरिता निवडुक लढविणा–या इच्छुक उमेव्दारांना लागणा–या परवानग्या घेणे अधिक सोईचे व्हावे.

याकरिता मा.राज्य निवडणूक आयोग यांच्या निर्देशाप्रमाणे तसेच मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये दि. १९ डिसेंबर २०२५ पासून अकोला महानगरपालिकेच्या गांधी रोड वरील मुख्य कार्यालय येथे एक खिडकी योजना कार्यान्वीत करण्यात आली आहे. या एक खिडकी योजना अंतर्गत निवडणूक लढविणा–या इच्छुक उमेव्दारांना पाणी पट्टी कर, मालमत्ता कर व मनपाचे इतर दायित्व तसेच शौचालय बाबतचे, मनपाचे कंत्राटदार नसल्याचे ना हरकत प्रमाणपत्र तसेच मंडप, कमानी, ध्वज, बॅनर साठी लागणारी परवानगी याचसोबत परवानगीसाठी लागणारे दर ची माहिती देण्यात येणार आहे, तरी सर्व संबंधितांनी याची नोंद घेऊन मनपा प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

## थोडक्यात

### पिंजर पोलीस स्टेशन हद्दीत अल्पवयीन मुलीची छेड

**बार्शीटाकळी :** तालुक्यातील पिंजर पोलीस स्टेशन हद्दीतील एका गावात एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीची छेड काढण्यात येत होती, सदर आरोपी अल्पवयीन म्हणत होता की, मी माझ्या बायकोला फारकती देतो, आणि नेहमी घराबाहेर येऊन अश्लील इशारा करत होता, अशी फिर्याद पिंजर पोलीस स्टेशनचे ठाणेदार गंगाधर दराडे, पीएसआय पीएसआय अभिषेक नवघरे यांचेकडे प्राप्त झाली, त्यांनी क्षणाचाही विलंब न करता, अल्पवयीन मुलीची तक्रार लिहून घेतली, आणि घटनास्थळी जाऊन पंचनामा केला, व आरोपीला तात्काळ अटक केली, याप्रकरणी अल्पवयीन मुलींनी दिलेल्या फिर्यादीनुसार, आरोपी मंगेश आजबराव जाधव याचे विरुद्ध कलम ७५, ७८, ७९, ३५१, (२) ३५२, सह कलम ८,१२, पोस्को अधिनियम कारवाई करण्यात आली आहे, याबाबत पिंजरचे ठाणेदार गंगाधर दराडे यांनी अल्पवयीन मुलींचीं विश्वासाने चौकशी केली,. मुलीची सर्व बाजू समजून घेतली, वरिष्ठाच्या आदेशानुसार सदर युतीला पिंजरचे ठाणेदारांनीन्याय आणि धीर दिला, त्यामुळे पिंजर व परिसरात पोलिसांचेकौतुक होत आहे, यावेळी दाखल अधिकारी चंद्रशेखर हेड कॉन्स्टेबल गोरे, यांनी गुन्हा दाखल केला, तर या गंभीर घटनेचा तपास ठाणेदार गंगाधर दराडे व त्यांचे सहकारी हेडकॉन्स्टेबल सुभाष उघडे, हेडकॉन्स्टेबल नागसेन वानखेडे, कॉन्स्टेबल चंद्रशेखर गोरे, पोलीस कॉन्स्टेबल वैभव मोरे,वाहन चालक इत्यादी करीत आहेत.

### सरकारी कामात व्यत्यय आणल्याच्या आरोपातुन दोषमुक्त

**अकोला :** बिगर जमानती वारंट बजावण्यासाठी गेलेल्या पोलिसांच्या कामात व्यत्यय आणल्याच्या कारणावरुन अकोटफैल मधील पती पत्नीला न्यायालयाने त्यांच्या विरुध्द असलेल्या आरोपातुन दोषमुक्त केले. आझाद खान व त्याची पत्नी रा. ताज चौक अकोटफैल भागातील रहिवाशी आहे. आझाद खान याच्या विरुध्द दाखल असलेल्या एका प्रकरणात तो न्यायालया सदरसमोर हजर राहत नसल्यामुळे त्याचा बिगर जमानती वारंट काढण्यात आला होता. वारंट बजावण्यासाठी पोलिस गेले असतांना आझाद व त्याची पत्नी यांनी अडथळा निर्माण करुन कामात बाधा आणली. या कारणावरुन त्याचे विरुध्द सरकारी कामात व्यत्यय आणल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर प्रकरण न्यायालया समोर आल्यानंतर आझाद व त्याची पत्नी यांनी अडथळा निर्माण केला हे सरकार पक्ष ठोसपणे सिध्द करु शकले नाही.

# महिलेची सोन्याची पोत घेऊन आरोपी पसार

**पातुर,दि २० (प्रतिनिधी) :** पोलीस स्टेशन अंतर्गत चिखलगाव जवळ अकोला पातूर महामार्गावर १८ डिसेंबर रोजी दुपारी साडेचार वाजता१ महिला रस्त्याने फिरत असताना आरोपींनी रस्ता विचारत गळ्यातील पंधरा हजार रुपयाची सोन्या ची पोत हिसकावून पसार झाले. याप्रकरणी पोलिसांनी फिर्यादीच्या तक्रारीवरून अज्ञात दोनआरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.हकीकत अशा प्रकारे आहे की,नमूद घता वेळी व ठिकाणी यातील नमूद फिर्यादी ही रोडने फिरत असताना दोन अनोळखी मोटर सायकल स्वार इसम यांनी प्लीज 'मा जी ये रोड किधर जा रहा हम को पातुर खामगाव जाना है' असे म्हणता त्या मोटार सायकल वर मागे बसलेल्या इसमाने अचानक फिर्यादीचे गळ्यावर हात मारला व फीचे गळ्यात असलेली सोन्याची जुनी वापरते मंगळसूत्र ज्यात वीस षटकोनी मनी दोन ग्रॅम व तीन ग्रॅम चे पेंडल ज्यांची किंमत अंदाजे १५,०००/रुपयाचे हिसकावून घेऊन गेले .अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल केला आहे.

# नगरपरिषद, नगरपंचायत निवडणूक मतमोजणीसाठी प्रशासन सज्ज

**अकोला,दि २० (प्रतिनिधी) :** अकोला जिल्ह्यातील अकोट, मुर्तिजापुर, तेल्हारा, हिवरखेड नगरपरिषद आणि बार्शिटाकळी नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकी करिता मतदान दिनांक ०२ डिसेंबर,२०२५ रोजी झाले असून बाळापूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूकी करिता मतदान दिनांक २० डिसेंबर,२०२५ रोजी होणार आहे. आणि सर्व नगरपरिषद/नगरपंचायतींची मतमोजणी दिनांक २१ डिसेंबर,२०२५ रोजी होणार आहे. मतदान पुर्वी मतदान यंत्र सेटींग व सिलींग करण्याची प्रक्रिया करण्यात येते. सदर प्रक्रिया अकोट नगरपरिषदे करता दिनांक २८ नोव्हेंबर २०२५ रोजी तर मुर्तिजापुर,तेल्हारा,हिवरखेड आणि बार्शिटाकळी करिता २९ नोव्हेंबर,२०२५ रोजी तसेच बाळापूर करिता दिनांक १७ डिसेंबर,२०२५ रोजी संबंधित उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांच्या समक्ष करण्यात आली असून प्रत्येक बॅलेट युनिट (BU) व कंट्रोल युनिट (उण) बाबतीत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावर नोंदवही ठेवण्यात आलेली आहे.प्रत्यक्ष मतदान सुरु होण्याच्या एक तास आधी प्रत्येक मतदान केंद्रावर उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांच्या समक्ष मॉकपोल (अभिरुख मतदान) करुन मतदान यंत्रे उश्रशरी करुन सिल करण्यात आले व त्यावर उमेदवार किंवा त्यांचे मतदान प्रतिनिधी यांच्या स्वाक्ष–या घेण्यात आले.त्यानंतर प्रत्यक्ष मतदान सुरु करण्यात आले.प्रत्येक मतदान केंद्रावर उमेदवारांनी नियुक्त केलेले मतदान प्रतिनिधी पुर्ण दिवस हजर होते. मतदान प्रक्रिया संपल्यानंतर सदर मतदान प्रतिनिधी यांच्या समक्ष मतदान यंत्र बंद करुन सिलबंद करण्यात आलेले असून त्यावर सदर मतदान प्रतिनिधी आणि मतदान केंद्राध्यक्ष यांच्या स्वाक्ष–या घेण्यात आलेल्या आहेत. तसेच बाळापूर करिता दिनांक २० डिसेंबर,२०२५ रोजी मतदान होणार आहे.मतदान प्रक्रिये नंतर मतदानयंत्रे उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांच्या समक्ष संबंधित सुरक्षा कक्षात (Strong Room) मध्ये व्यवस्थीतपणे ठेवून सुरक्षा कक्ष सिलबंद करण्यात आले.सदर सिलवर उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी आणि निवडणूक निर्णय अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली आहेत.सिलबंद केलेले सुरक्षा कक्ष पोलीस यंत्रणेच्या ताब्यात देण्यात आले असून लॉगबुक ठेवून त्यामध्ये नोंद घेण्यात आलेली आहेत. सुरक्षा कक्षा मध्ये मतदानयंत्रे ठेवण्यापुर्वी सदर सुरक्षा कक्षा करिता पोलीस विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, विद्युत विभाग,अग्निशमन विभाग यांच्या कडून तपासणी करुन त्यांचे प्रमाणपत्र घेण्यात आलेले आहेत.

सुरक्षाकक्ष पेस्ट कंट्रोल करण्यात आलेले आहेत.

सुरक्षा कक्षा बाहेर CCTV उराशीर लावण्यात आलेले असून त्यांचे स्क्रीन सुरक्षाकक्षा बाहेर लावण्यायत आलेले आहेत. तसेच उमेदवारांना त्या ठिकाणी पाहण्यासाठी व्यवस्था करण्यात आलेली आहे.सुरक्षा कक्षा बाहेर पोलीस अधिकारी आणि शस्त्र पोलीस कर्मचा–यांच्या २४ तासांच्या ३ पाळी मध्ये बंदोबस्त लावण्यात आलेले असून इतर अधिकारी व कर्मचा–यांच्या सुध्दा निगरानी राखण्याकरिता ड्युटी लावण्यात आली असून त्यांना सुरक्षा कक्षा बाहेर बसण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. मतमोजणी करिता सुरक्षा कक्षाचे सिल उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी आणि संबंधित अधिकारी यांच्या समक्ष काढून व्हिडीओ कॅमरा समोर सुरक्षा कक्ष उघडण्यात येईल आणि फेरी निहाय मतदानयंत्रे सुरक्षाकक्षातुन काढून मतमोजणी कक्षात आणल्या जाईल.

# अकोला गार्डन क्लब व महाबीज द्वारा आयोजित पुष्प प्रदर्शनीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**अकोला,दि २० (प्रतिनिधी) :** अकोला गार्डन क्लब व महाबीज द्वारा आयोजित दोन दिवसीय पुष्प प्रदर्शनीच्या पहिल्या दिवशी अकोलेकर नागरिकांनी उत्स्फूर्त गर्दी केली होती. दिनांक २० व २१ डिसेंबर असं दोन दिवस प्रदर्शन अकोल्यातील शुभ मंगल कार्यालय येथे अकोला गार्डन क्लब च्या वतीने आयोजित केलेला आहे. दिनांक २० डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांनी दीप प्रज्वलन करून प्रदर्शनीचे उद्घाटन केले, त्यानंतर अकोला जिल्ह्याचे खासदार अनुप धोत्रे, शेतकरी नेते प्रकाश पोहरे, उपविभागीय अधिकारी संजय खडसे, प्रभात किड्स च संचालक डॉ. गजानन नारे, यांच्यासह इतरही मान्यवरांनी भेट दिली.

अकोला शहरातील पुष्पप्रेमी व पर्यावरण प्रेमी नागरिकांच्या सहकार्याने दरवर्षी या प्रदर्शनाचे आयोजन केले जाते. यामध्ये विविध प्रकारचे गुलाब, शेवंती सह इतरही अनेक दुर्मिळ जातींच्या फुलांचा समावेश असतो. सोबतच कॅक्टस, इंडोर प्लांट्स, व विविध प्रकारच्या औषधीय गुणधर्म असणारे वृक्ष सुद्धा या प्रदर्शनीमध्ये बघायला मिळाले. काही दुर्मिळ वनस्पतींच्या जाती सुद्धा येथे प्रदर्शनीमध्ये असल्याने अकोलेकरांनी त्याचा मनमुराद आनंद लुटला. यंदा प्रदर्शनीच हे ५२ व वर्ष असून पन्नास वर्षांपूर्वी ॲड. भु. ना. मुखर्जी, वसंत बाबू खंडेलवाल(मारोती शोरुम) केदार अग्रवाल, व त्यांच्या सहकाऱ्यांनी ही संस्था स्थापन केली होती. पन्नास वर्षाच्या प्रवासात या संस्थेने अकोलेकरांच्या मनात स्थान मिळवलं असून दरवर्षी नागरिक या प्रदर्शनीची वाट बघत असतात. पहिल्याच दिवशी प्रदर्शनीला हजारो नागरिकांनी भेट



देऊन प्रदर्शनीच कौतुक केलं असून, गार्डन क्लबचे ज्येष्ठ सभासद यू.टी. ठाकरे, हिरुळकर व अग्रवाल यांनी सुद्धा उपस्थिती दर्शविली होती. नागपूर येथून आलेल्या परीक्षकांनी उत्कृष्ट फुल व झाडांची गटनिहाय परीक्षण करून त्यांच्या गुणवत्तेनुसार त्यांना श्रेणी उपलब्ध करून दिल्या आहे. मात्र बक्षीस समारंभ दुसऱ्या दिवशी संध्याकाळी प्रदर्शनाच्या समारोपीय कार्यक्रमात होणार आहे. पुष्पपदर्शनीच्या यशस्वी आयोजनामध्ये अकोला गार्डन क्लबचे माजी अध्यक्ष जयप्रकाश पाटील, अजय सेंगर यांचे सह विद्यमान अध्यक्ष संजय शर्मा, उपाध्यक्ष शरद कोकाटे, सुधीर राठी, सचिव श्याम गोटफफोडे, सुनील कवीश्वर, विजय ढवळे, निशिकांत बडगे, दिनेश पारेख, नीरज आवंडेकर, संजय हैडा, अनुराधा ढवळे आदि उपस्थित होते.

# चोरीच्या बुलेटसह दोन दुचाकी जप्त

### रामदासपेठ पोलिसांची कारवाई

**अकोला,दि २० (प्रतिनिधी) :** पोलीस स्टेशन रामदासपेठ, अकोला येथे दाखल असलेल्या मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यात रामदास प ठ पोलिसांनी अथक व शर्थीचे प्रयत्न करत राज्याबाहेर मध्यप्रदेशातील इंदूर, भोपाळ व नर्मदापुरम (होशंगाबाद ) येथून चोरीची बुलेट मोटारसायकल तसेच आणखी एक दुचाकी असा एकूण १ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.अकोला जिल्ह्यात मागील काही महिन्यांपासून मोटारसायकल चोरीचे प्रकार वाढल्याने पोलीस अधीक्षक अकोला अचिंत चांडक यांनी संबंधित पोलिस ठाण्यांना चोरीच्या दुचाकी शोधण्याबाबत स्पष्ट सूचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने, दिनांक १५ डिसेंबर २०२५ रोजी फिर्यादी नागे लोकेश प्रकाश अग्रवाल (२५) रा. राजपूतपुरा, अकोला) यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस स्टेशन रामदासपेठ येथे गुन्हा क्रमांक ३५४ /२५, कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. फिर्यादीची रॉयल एनफिल्ड कंपनीची ग्रे रंगाची बुलेट मोटारसायकल एम एच ४७– एसी – ५४०३, किंमत अंदाजे १ लक्ष ५० हजार रुपये, डॉ. एस. एम. अग्रवाल यांच्या दवाखान्याजवळून चोरीस गेली होती. तपासादरम्यान वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदारांच्या मदतीने आरोपी मिलेश राजू काबे (२८), रा. नागपूर यास नागपूर




येथून ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने सदर गुन्ह्याची कबुली दिली असून मूर्तिजापूर (जि. अकोला) व गोंदिया रेल्वे स्टेशन परिसरातूनही मोटारसायकली चोरी केल्याचे उघड झाले. आरोपीकडून चोरी केलेली बुलेट मध्यप्रदेशातील इंदर, भोपाळ व नर्मदापुरम (होशंगाबाद) येथील रेल्वे स्टेशन परिसरातून हस्तगत करण्यात आली. तसेच पोलीस स्टेशन मुर्तिजापूर हद्दीतील चोरीची एक मोटारसायकल एम एच –३०– क्यू – ५८४८, किंमत अंदाजे ४० हजार रुपये जप्त करण्यात आली. अशा प्रकारे एकूण १ लक्ष ९० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे.

# उमरा–सावरगाव मार्गे अकोला जिल्हा हद्दीपर्यंत नवीन रस्त्याची मागणी

## जिल्हाधिकाऱ्यांना लेखी निवेदन; ३० डिसेंबरला रास्ता रोकोचा इशारा

**पातुर,दि २० (प्रतिनिधी) :** आलेगाव येथील सामाजिक कार्यकर्ते निलेश तुकाराम कापकर यांनी आज दि. १९ डिसेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी, अकोला यांना एक लेखी निवेदन सादर करून पातूर तालुक्यातील उमरा गाव ते सावरगाव मार्गे अकोला जिल्हा हद्दीपर्यंत नवीन रस्ता बांधून देण्याची जोरदार मागणी केली आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, उमरा–सावरगाव मार्गे अकोला जिल्हा हद्दीपर्यंतचा सध्याचा रस्ता अत्यंत खराब अवस्थेत असून मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांमुळे वाहनधारकांसाठी हा मार्ग जीवघेणा ठरत असून वारंवार अपघात घडत आहेत. सध्याची परिस्थिती पाहता भविष्यात मोठ्या दुर्घटनांची शक्यता नाकारता येत नाही, अशी गंभीर बाब त्यांनी



प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली आहे.या रस्त्याचा फटका सर्वाधिक शेतकरी बांधवांना बसत आहे. शेतात जाण्या–येण्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागत असून वेळ व खर्च दोन्ही वाढत आहेत. तसेच शाळकरी मुले रस्त्याअभावी व खराब रस्त्यामुळे नियमितपणे शाळेत ये–जा करू शकत नाहीत. परिणामी अनेक मुलांना शिक्षणापासून वंचित राहावे लागत असल्याची चिंता निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे.

याशिवाय नातेवाईक व पाहुण्यांकडे जाणे, रुग्णांना तातडीने दवाखान्यात पोहोचवणे, दैनंदिन व्यवहार पार पाडणे यामध्येही मोठा विलंब व अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे हा रस्ता केवळ सोयीसाठी नव्हे, तर सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी अत्यंत आवश्यक असल्याचे कापकर यांनी स्पष्ट केले आहे.या सर्व बाबी लक्षात घेऊन उमरा–सावरगाव मार्गे अकोला जिल्हा हद्दीपर्यंतचा नवीन रस्ता तात्काळ मंजूर करून त्याचे काम सुरू करावे, अशी ठोस मागणी त्यांनी निवेदनातून केली आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास दि. ३० डिसेंबर २०२५ रोजी रास्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.आता जिल्हा प्रशासन या गंभीर प्रश्नाकडे कितपत लक्ष देणार आणि नागरिकांना दिलासा कधी मिळणार, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पूर्व तालुका अध्यक्षपदी एकनाथ सरप पाटील



**अकोला,दि २० (प्रतिनिधी) :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पूर्व तालुका अध्यक्षपदी एकनाथ हरिभाऊ सरप पाटील यांची नियुक्ती पक्षनेते राजू उंबरकर यांच्या हस्ते करण्यात आली पक्षाचे जिल्हा अध्यक्ष राजेश काळे,पंकज साबळे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करून अकोला तालुक्यात बांधणी व सन्माननीय राज साहेब ठाकरे यांचे विचार घरोघरी पोहोचवण्याचे सूचना करण्यात आल्या यावेळी पक्षाचे जनहित पक्षाचे राज्य सरचिटणीस नंदकिशोर शेळके महिला आघाडीच्या सौ प्रशांसा अबेरे जिल्हा सचिव ललित यावलकर शहराध्यक्ष सौरभ भगत राकेश शर्मा इत्यादी मनसेचे पदाधिकारी उपस्थित होते

## वैष्णवी भुडके एल.एल.बीच्या परीक्षेमध्ये अमरावती विद्यापीठात प्रथम मेरिट

**अकोला :** येथील वैष्णवी संजय भुडके यांनी एलएलबी (तीन वर्ष ) विधी अभ्यासक्रमात अमरावती विद्यापीठमधून प्रथम मेरिट येऊन अकोल्याचा मान विद्यापीठ मध्ये उंचावर ठेवला आहे. अत्यंत कठोर मेहनतीने आणि जिद्दीने तिने सर्व तीनही वर्ष चांगल्या मार्कांनी पास होऊन उल्लेखनीय मार्क मिळून अमरावती विद्यापीठामध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे.

# एक्सप्रेसमध्ये गांजाची वाहतूक;अट्टल आरोपी जाळ्यात!

**▪अकोला,दि २० (प्रतिनिधी) :** अकोला रेल्वे पोलिसांनी अंमली पदार्थ तस्करांविरुद्ध मोठी मोहीम राबवत एका मोठ्या तस्करीचा पर्दाफाश केला आहे. गांधीधाम स्पेशल एक्सप्रेसमध्ये गांजाची वाहतूक होत असल्याची खात्रीलायक माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचून ही कारवाई केली. या कारवाईत पोलिसांनी १६ किलो ४१७ ग्रॅम गांजा जप्त केला असून एका महिलेसह दोन जणांना अटक करण्यात आली आहे.

अकोला रेल्वे पोलिसांना १९ डिसेंबर २०२५ रोजी एका गुप्त बातमीदारामार्फत महत्त्वाची माहिती मिळाली होती. ट्रेन क्रमांक २०८०३ गांधीधाम स्पेशल एक्सप्रेसच्या ए/१ कोचमधून गांजाची तस्करी केली जात असल्याचे समजताच रेल्वे पोलीस स्टेशनच्या प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक अर्चना गाढवे यांनी तात्काळ एक विशेष पथक तयार केले. या पथकाने रेल्वे सुरक्षा बलाच्या



मदतीने अकोला रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक १ वर या ट्रेनची प्रतीक्षा करत कडक बंदोबस्त तैनात केला.

दुपारी १२ च्या सुमारास ट्रेन प्लॅटफॉर्मवर येताच पोलिसांनी ए/१ कोचमध्ये प्रवेश केला. यावेळी बर्थ क्रमांक १ वर सत्यम प्रफुल पात्रा (वय २६) आणि बर्थ क्रमांक २ वर पूजा चितरंजन जेना (वय २३) हे दोघे संशयास्पदरीत्या बसलेले आढळले. त्यांच्याकडे असलेल्या मोरपंखी रंगाच्या सॅकबॅग आणि इतर दोन बॅगांची पोलिसांनी विचारपूस केली. मात्र, त्यांनी दिलेल्या उत्तरांमध्ये विसंगती आढळल्याने पोलिसांचा संशय बळावला. त्यानंतर पंचांच्या समक्ष बॅगांची झडती घेतली असता, खाकी सेलोटेपने गुंडाळलेले ८ बंडल सापडले.पोलिसांनी जप्त केलेले बंडल उघडले असता त्यातून गांजाचा उग्र वास येत होता. या गांजाचे वजन केले असता तो १६ किलो ४१७ ग्रॅम इतका भरला. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत या गांजाची किंमत सुमारे २ लाख ४० हजार रुपये इतकी असल्याचे सांगण्यात आले आहे. हे दोन्ही आरोपी ओडिशा राज्यातील गंजम जिल्ह्यातील रहिवासी असून त्यांनी हा गांजा कुठून आणला आणि तो पुढे कोणाला पुरवण्यात येणार होता, याचा आता तपास केला जात आहे.या प्रकरणी अकोला लोहमार्ग पोलीस स्टेशनमध्ये अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यान्वये (छझ्झड) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक मंगेश शिंदे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी पांडूरंग सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली अकोला रेल्वे पोलीस आणि रेल्वे सुरक्षा बलाच्या संयुक्त पथकाने यशस्वी केली. या कारवाईमुळे रेल्वेमार्गे होणाऱ्या तस्करीवर पोलिसांची करडी नजर असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

# अकोला विमानतळाच्या प्रश्नावर जनतेचा संताप ; पंतप्रधानांना निवेदन

**▪अकोला,दि २० (प्रतिनिधी) :** अकोला विमानतळाच्या विस्तारीकरणास तातडीने मंजुरी देऊन नियमित विमानसेवा सुरू करण्याची मागणी करून निर्भय बनो जन आंदोलन, अकोला जिल्हा यांनी भारताचे पंतप्रधान कार्यालय, नवी दिल्ली येथे निवेदन सादर केले आहे. हे निवेदन संयोजक गजानन हरणे यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हाध्यक्ष प्रमोद धमार्ळे यांच्या हस्ते सादर करण्यात आले. निवेदनात विदर्भाच्या मध्यवर्ती भागात असलेल्या अकोला जिल्ह्याच्या विकासापासून वंचित राहण्याची तीव्र भावना व्यक्त केली आहे. विशेषतः अकोला विमानतळाचा प्रश्न अनेक दशकांपासून प्रलंबित असून, केवळ आश्वासनांपुरते मर्यादित राहिल्याचा आरोप करण्यात आला आहे. विमानतळ विस्ताराची वेळोवेळी घोषणा होत असली, तांत्रिक अडथळे मांडले जात असले तरी प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. निवेदनात म्हटले आहे की, कोणत्याही सरकारकडे काँग्रेस, महाविकास आघाडी अथवा भाजप अकोला विमानतळाचा प्रश्न गांभीर्याने हाताळला गेला नाही.काही लोकप्रतिनिधी व पालकमंत्र्यांनी दुर्लक्ष केल्यामुळे जनतेमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. हिवाळी अधिवेशनात निर्णय न झाल्यास संपूर्ण जिल्ह्यात तीव्र जनआंदोलन उभे राहील, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला आहे. निवेदनात अकोला विमानतळाचे महत्त्व अधोरेखित करत म्हटले आहे की, विमानसेवा सुरू झाल्यास व्यापार, उद्योग व गुंतवणुकीला गती मिळेल, तसेच पुणे,मुंबई, हैदराबाद, बेंगळुरू यांसारख्या शहरांकडे जाणाऱ्या युवकांना शिक्षण व नोकरीसाठी मोठा दिलासा मिळेल. वैद्यकीय आपत्कालीन सेवा, प्रशासकीय कार्यक्षमता व शासकीय यंत्रणेच्या वेगासाठी विमानतळ अत्यावश्यक असल्याचेही नमूद केले आहे. अकोला विमानतळाच्या विस्तारीकरणास तातडीने मंजुरी द्यावी, नियमित विमानसेवा सुरू करण्यासाठी केंद्रस्तरीय अडथळे दूर करावेत, आवश्यक निधी व प्रशासनिक मंजुरी विलंब न करता सुरू करावी, तसेच विमानतळाला छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव देण्यात यावे. निवेदनात या मागण्यांचा जोर देत अकोला जिल्ह्याच्या विकासासाठी विमानतळ हा 'ऑक्सिजन' आहे, असेही अधोरेखित केले आहे.

## विषमुक्त शेतीकडे वाटचाल : माटोड्यात विषमुक्त अभियानाला सुरुवात

**मूर्तिजापूर :** तालुक्यातील माटोडा गावात गेल्या तीन वर्षांपासून राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत सेंद्रीय व नैसर्गिक शेतीचा यशस्वी प्रयोग सुरू असून, या उपक्रमामुळे गावात विषमुक्त शेतीची चळवळ अधिक बळकट होत आहे. याच अनुषंगाने प्रकल्प संचालक आत्मा, अकोला तसेच राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशनचे अध्यक्ष डॉ मुरली इंगळे, उपसंचालक प्रेमसिंग मारक, तालुका कृषी अधिकारी दीपक तायडे यांनी माटोडा गावास भेट देत प्रत्यक्ष शेतात तयार होणाऱ्या सेंद्रीय निविष्ठांची पाहणी केली.माटोडा येथील प्रगतशील शेतकरी गजानन ढोकणे यांच्या शेतात नैसर्गिक पद्धतीने तयार करण्यात येणाऱ्या विविध निविष्ठांचे प्रात्यक्षिक अधिकाऱ्यांना दाखविण्यात आले. यामध्ये गांडूळखत निर्मिती, अर्क, ड्रायक्रोड्रमा, दसपर्मी जीवामृत, तसेच एस नाईन कल्चरच्या सहाय्याने काडी- कचऱ्यापासून सेंद्रिय खत निर्मिती या नावीन्यपूर्ण व शाश्वत प्रयोगांचा समावेश होता.

## गस्त पथकावर प्राणघातक हल्ला; आरोपीला तीन महिन्यांचा कारावास

**▪अकोला,दि २० (प्रतिनिधी) :** मूर्तिजापूर तालुक्यात अवैध रेती उत्खनन व वाहतुकीवर निर्बंध घालण्यासाठी गस्त घालणाऱ्या पथकावर हल्ला केल्याप्रकरणी गोरेगाव, येथील संतोष विलास पातोंड याला गुरूवारी जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. डी. क्षीरसागर यांच्या न्यायालयाने दोषी ठरवलेआहे. न्यायालयाने आरोपीला तीन महिने कारावास व १५०० रुपये दंड ठोठावला असून, दंड न भरल्यास अतिरिक्त १५ दिवस कारावासांची शिक्षा सुनावली आहे. मूर्तिजापूर तहसील कार्यालयाने अवैध रेती उत्खननावर नियंत्रण ठेवण्यासाठी गस्ती पथक नेमले होते. त्यामध्ये तहसीलदार श्रीकांत मिसाळ, मंडळ अधिकारी रामराव जाधव, तलाठी प्रवीण ताले, दिलीप करवते यांचा समावेश होता. ११ डिसेंबर २०१८ रोजी पहाटे ३ वाजून २५ मिनिटांनी गोरेगाव टी-पॉइंटवर गस्त पथकाला विनानंबरची ट्रॅक्टर व ट्रॉली संशयास्पद हालचाली करताना आढळली. पथकाने ट्रॅक्टर थांबवण्याचा प्रयत्न केला असता, आरोपी संतोष पातोंडयाने ट्रॅक्टर पथकाकडे नेण्याचा प्रयत्न केला व गस्ती पथकावर हल्ला करून पळ काढला. यामुळे सरकारी कामात अडथळा आला व कर्मचाऱ्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला. या प्रकरणातील अन्य आरोपी विलास पातोंड याने मुख्य आरोपीला चिथावणी दिल्याचे आरोप होते; मात्र पुराव्यांच्या अभावामुळे त्याला न्यायालयाने मुक्त केले. फिर्यादी रामराव जाधव यांनी बोरगाव मंजू पोलिस ठाण्यात तक्रार दिल्यानुसार गुन्हा दाखल झाला होता. या प्रकरणाचा तपास पोलिस उपनिरीक्षक युवराज उईके यांनी केला. सरकार पक्षाने एकूण ८ साक्षीदार तपासले. अतिरिक्त सरकारी वकील किरण खोत यांनी सरकारची बाजू मांडली.

## कुऱ्हाड फिरवून नागरिकांना जखमी केल्याप्रकरणी पातुर पोलिसात गुन्हा दाखल

**▪पातुर,दि २० (प्रतिनिधी) :** पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या संभाजी चौक मध्ये कुराड फिरवून नागरिकांना जखमी केल्याप्रकरणी पातुर पोलिसांनी आरोपी सनी कांबळे यांचे विरुद्ध अपराध क्रमांक ३६४ कलम ११८( १) बी एन एस नुसार गुन्हा दाखल केला आहे दिनांक १९ डिसेंबर २०२५ ला संध्याकाळी साडेआठ वाजताच्या दरम्यान यातील फिर्यादी कुणाल मारुती खंडारे तथा फिर्यादीचा मित्र कार्तिक कावळे राहणार खानापूर तालुका पातुर हे संभाजी चौक येथे पान टपरी समोर मित्राला भेटण्याकरिता गेले होते तेथे आरोपी सनी कांबळे हा आला व त्याच्या हातामध्ये कुऱ्हाड होती फिर्यादीच्या जवळ येऊन विनाकारण कुऱ्हाड फिरवत होता कुराड फिरवत असता फिर्यादीच्या पाठीवर लागली फिर्यादीचा मित्र कार्तिक कावळे याला सुद्धा कुऱ्हाड लागुन जखमी केले असे फिर्यादीच्या दिनांक २० डिसेंबर २०२५ ला दिलेल्या तक्रारीवरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासा अधिकारी पोलीस हेडकॉन्स्टेबल गजानन मानकर यांनी तपासात घेतला आहे तर सदर गुन्हा दाखल करताना आरोपीवर मागील मोठे गुन्हे दाखल असल्याचा उल्लेख सुद्धा करण्यात आला

## थोडक्यात

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा दोन दिवसीय जागर

**अकोला :** गत सतरा वर्षापासून महानगरात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचाराचा जागर करीत वैचारिक प्रबोधन करणाऱ्या अ. भा. श्री गुरुदेव सेवा मंडळ अंतर्गत वं. राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज सेवा समितीच्या वतीने राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या ५७ व्या पुण्यतिथी पुण्यस्मरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये अनेक वैचारिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांची रेलचेल राहणार आहे. दि २७ व २८ डिसेंबर रोजी सिव्हिल लाईन परिसरातील जि. प. कर्मचारी भवन येथे आयोजित या उत्सवाचा प्रारंभ शनिवार दिनांक २७ डिसेंबर रोजी सकाळी ६ वाजता गायत्री परिवाराचे डॉ. अजय उपाध्याय यांच्या सामूहिक ध्यान व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमा पूजनाने होणार आहे. या नंतर सकाळी ९ वाजता राजेश्वर मंदिर येथून ग्रंथराज ग्रामगीता व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेची भव्य शोभायात्रा मान्यवरांच्या हस्ते पालखी पूजनाने प्रारंभ होणार आहे. पं. राष्ट्रसंत श्री ही शोभायात्रा सिटी कोतवाली, गांधी रोड, धिंग्रा चौक, मोठे पोस्ट ऑफिस, सीताबाई कॉलेज मार्गे सिव्हिल लाईन परिसरातील जि. प. कर्मचारी भवनात या शोभायात्रेचे समापन होणार आहे. दु १२ वाजता महोत्सवाचा उद्घाटन सोहळा उद्घाटक म्हणून अ. भा. श्री गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज मोझरीचे प्रचार प्रमुख प्रकाश महाराज वाघ राहणार असून स्वागताध्यक्ष अन्नपूर्णेश पाटील सत्र अध्यक्ष डॉ गजानन नारे राहणार आहेत. या सोहळ्यात स्व कालूराम रुहाटिया चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने व्यसनमुक्ती तुकडोजी महाराज सम्राट हभप मधुकर महाराज खोडे यांना व स्व बलदेवरव पाटील यांच्या स्वब स्मृतीत जीवन गौरव पुरस्कार बच्चुभाऊ कडू यांना बहाल करून त्यांचा जाहीर सत्कार होणार आहे. यानंतर तज्ज्ञांचे अभंग वाणी, राष्ट्रसंत संगीतमय जीवनदर्शन ग्रामगीता प्रवचन आदी कार्यक्रम होऊन रात्री ८ वाजता राष्ट्रीय कीर्तनकार हभप खोडे महाराज यांचा कीर्तन कार्यक्रम होणार आहे. दुपार पासून विविध रविवार दिनांक २८ डिसेंबर रोजी सकाळ पासून विविध कार्यक्रम होऊन दुपारी १२ वाजता भव्य युवक युवती संमेलन आयोजित करण्यात आले आहे. सायंकाळी ७ वाजता भजन संध्येचा कार्यक्रम होणार असून रात्री ८ वाजता संदीपपाल महाराज व रामपाल महाजन यांचा कीर्तन कार्यक्रम होऊन दोन दिवसीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी महोत्सवाचा समारोप करण्यात येणार आहे.

## राज्यस्तरीय वुशू पंच परीक्षेसाठी निवड



**▪अकोला,दि २० (प्रतिनिधी) :** पुणे येथे महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषद महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त महाराष्ट्र अँम्युचअर वुशू असोसिएशन आयोजित राज्यस्तरीय वुशू पंच परीक्षासाठी वासुदेव वाघ पाटील, डॉ खुशबू चोपडे,रितिक सारवान, ओम सारवान, फ्लोरेशन नाशीकर, सोनु खारीया, साक्षी जोगे, शिवाणी पुंडकर यांची निवड करण्यात आली आहे. राज्यस्तरीय वुशू पंच परीक्षेत निवड झालेल्यांचे अभिनंदन स्वागत सामाजिक कार्यकर्ते मा. सुहासिनीताई धोत्रे, जिल्हा क्रीडा अधिकारी सतिषचंद्र भट्ट,जिल्हा क्रीडा परिषद सदस्य मा सैय्यद जावेद आली, दि महाराष्ट्र ऑम्युचअर कराटे असोसिएशन चे अध्यक्ष सिहान अरुण सारवान यांनी केले.

## डॉ. श्री शिवकुमार स्वामी महाराज यांचे प्रवचन

**▪अकोला,दि २० (प्रतिनिधी) :** सिध्दारुढ आध्यात्म समिती डाबकी रोडच्या वतीने नाना मंगलम मंगल कार्यालय येथे डॉ. शिवकुमार स्वामी महाराज यांचे अध्यात्मिक ज्ञानयज्ञ प्रवचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २० ते २५ डिसेंबर या दरम्यान प्रवचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

बीदर येथील सिध्दारुढ मठ येथील डॉ. शिवकुमार स्वामी महाराज भगवदब गीतांचे श्रेष्ठ भाष्यकार, वेदाचे जानकार, ओजस्वी वक्तृत्व शैलीतून प्रवचन करणार आहेत. या आध्यात्मिक प्रवचनाचा लाभ घ्यावा असे आवाहन सिध्दारुढ समिती आयोजन समितीने केले आहे.

## जुने शहरातील शाळा परिसरात रोड रोमियोंचा सुळसुळाट

**▪अकोला,दि २० (प्रतिनिधी) :** जुने शहरातील विविध शाळा परिसरात रोड रोमियोंचा सुळसुळाट झाल्याने वाद विवाद व मारहाणीच्या घटनामध्ये वाढ झाली आहे. यातील ब-याच घटना पोलीसापर्यंत पोहचत नाही.संपूर्ण जुने शहरात तीसच्या जवळपास शाळा, कान्व्हेंट, कॉलेज आहेत. या शाळा परिसरात सकाळ पासून ते संध्याकाळपर्यंत तसेच खासगी शिकवणी वर्ग परिसरात सुध्दा यांचा त्रास सहन करावा लागतो.

काही शिकवणीच्या वेळा पहाटे सहाच्या सुमारास असल्याने पहाटे ५.३० पासून शिकवणी वर्ग ला येण्याची वर्दळसुरु होते. या वेळी हे रोमियो आपल्या दुचाकीवरून व कर्कश हॉर्न वाजवून मुलींना त्रास देणे सुरु असते. आपली मुलगी सुरक्षीत शिकवणीला जावी यासाठी स्वतः मुलीसोबत सोडायला जातात.पोलीसांचे दामिनी पथक व त्या पोलिस स्टेशनचे कर्मचारी राउंड शाळेच्या वेळेवर गस्त घालतात. त्या शाळेसमोर एक सेल्फी काढतात व दोन मिनिटे उभे राहून निघून जातात. या रोड रोमियोंना यांच्या वेळा माहीत असल्याने त्या वेळेस हे कंपू तिकडे फटकतसुध्दा नाही. हे निघून गेल्यावर परिस्थिती जैसे थे. हा प्रकार रोजचा आहे.

पोलिस विभागाने या परिसरात गस्त घालीत असताना आपल्या शासकीय वाहनाद्वारे न जाता साध्या वेषात शाळा व शिकवणी वर्ग परिसरात गस्त घालणे आवश्यक आहे.जुने शहर परिसरातील शाळा परिसरात कायमस्वरूपी पोलीस कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. रोज सदर कर्मचारी बदलल्या गेले पाहिजे, नियम आवश्यक आहे.हानुकतीच एका विद्यार्थिनीची घटना घडली असून पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. यावर पोलीस अधीक्षकांनी व्यक्तीशः लक्ष द्यावे व कडक उपाययोजना कराव्यात अशी मागणी पालकवर्गांनी केली आहे.

# गाडगेबाबा वैकुठधामात महीलानी चालवला खराटा ११७ निराश्रितांना ब्लॅकेट साडी चोळी वितरण

## छायाताई नंदकीशोर कौसकार यांचे घरी पुण्यतीथीला हजारो भावीकानी लावली हजेरी

**▪हिवरखेड,दि २० (प्रतिनिधी) :** हिवरखेड येथे सालाबाद प्रमाने गाडगे नगर येथील संत गाडगेबाबा मदीर येथे व अकोट रोड गाडगेबाबा वैकुंठ धाम येथे गाडगेबाबाचा स्वच्छतेचा मंत्राचा जागर करत महिलानी चालवला खराटा तसेच ५९ व्या पुण्यतीथीला गाडगेबाबा मंदीरात पोलीस पाटील प्रकाश गावंडे तसेच कीरण सेदाणी भाजपा शहर अध्यक्ष सेवानिवृत्त ऐ एस आय महादेव नेवारे,संतोष राठी,भगवान ठाकरे वासुदेव वाघ ,मूख्याध्यापीका सौ प्रमीला मानकर, सौ अनीता नेवारे, नंदाबाई सवदे ऊत्कर्ष नेरकर सौ रेखाते,तसेच आयोजक संतगाडगेबाबा सेवा समीती हिवरखेड चे सस्थापंक जील्हा दिव्यांग सेलचे बाळासाहेब नेरकर, या मान्यवराकडुन गाडगेबाबा मूर्तीपुजन करन्यात आले व बाबाना पुष्पसूमने व माल्यार्पन वाहुन मानवंदना करन्यात आली त्या नंतर समाजातील निराश्रीत अंध रोगी गरजवतांना वरील संत गाडगेबाबा सेवा समीतीला मदतीचा हात हात देनारे याचे सहकार्याने समीती कडुन साडी चोळी ब्लंकेट चे व चहा फराळ चे वीतरण वरील मान्यवरा,हस्ते करन्यात आले त्या अगोदर गाडगेबाबा स्मशानभूमी मधे गाडगेबाबा अनुआयानी बाबाचा खराटा चालवुन स्मशानभूमी मधे स्वच्छता अभियान राबवीले संत गाडगेबाबा समीतीला सहकार्य करनारे गजानन राठोड



गणेश सोळंके, गजानन वानखडे,प्रफुल पवार,महादेव नेवारे माळवे साहेब,राजेश देशमूख ,जॉन्टी राऊत, गणेश सावरकर,वारीसखॉ शातांराम कवळकार ओम अस्वार, विरेद्र येऊल ईत्यादींच्या सहयोगाने वरील गाडगेबाबाची ६९ वी पुन्यतीथी साजरी केली तर गाडगेबाबा सेवा समीतीकडून बाळासाहेब नेरकर अठरा वर्षापासून हा ऊपक्रम राबवित असून त्यांचे सर्व गावकरी कौतूक करत आहेत तसेच होली फेथ कानव्हेंट जवळ गाडगेबाबा पुण्यतीथीला दरवर्षाला भंडारा करनाया सौ छायाताई कौसकार व नंदकीशोर कौसकार यांचे निवास स्थानी सूद्धा गाडगेबाबा चे फोटोचे पुजन करन्यात येऊन छायाताई कौसकार राबवीत असलेल्या पुण्यतीथी निमीत्त महाप्रसादाला



सालाबाद प्रमाणे पंचक्रोशितील व गावर्कयानी गोपाला गोपाला देवकी नंदन गोपालाचा गजर करत महाप्रसाद संपे पर्यंत महाप्रसादाला हजेरी लावली

## विविध शासकीय कार्यालयात २ लाख ९९ हजार ५१ पदे रिक्त

**▪अकोला,दि २० (प्रतिनिधी) :** एकीकडे बेरोजगार नोकरीसाठी वणवण भटकत असतांनाच राज्यभरातील विविध शासकीय कार्यालयात २ लाख ९९ हजार ५१ पदे रिक्त असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. रिक्त असलेली ही पदे भरली तर अनेक बेरोजगारांच्या पोटापाण्याचा प्रश्न सुटू शकतो. परंतु शासकीय स्तरावर पदभरतीच्या अनुषंगाने कारवाईच झाली नसल्याचे या आकडेवारीवरुन दिसून येते. राज्यभरातील विविध सरकारी कार्यालयात ८ लाख १८ हजार ५०३ मंजुर पदे असली तरी प्रत्यक्षात २ लाख ९९ हजार ५१ पदे रिक्त आहेत. रिक्त पदांची ही टक्केवारी ३६.५४ एवढी येते. अलीकडेच नागपूर या ठिकाणी झालेल्या हिवाळी अधिवेशनात देखील रिक्त पदांचा हा मुद्दा गाजला होता.

## गाडगेबाबा बेघर निवारा परिसरात वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन कार्यक्रम संपन्न



**अकोला :** श्री शिवाजी महाविद्यालय, अकोला येथे कार्यरत असलेले प्रबंधक श्री. राजेश गीते यांच्या मातोश्री सौ. स्व. उषाताई सुरेश गीते यांच्या स्मृतिप्रित्यर्थ गाडगे बाबा बेघर निवारा येथे विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. केवळ स्मरण न करता समाजोपयोगी कार्यातून त्यांच्या आठवणींना उजाळा देण्याचा हा उपक्रम उपस्थितांच्या मनाला स्पर्शून गेला. या उपक्रमांतर्गत बेघर निवारा परिसरात वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन करण्यात आले. निसर्ग जपा. जीवन वाचवा या संदेशासह लावण्यात आलेल्या रोपांनी स्व. उषाताई गीते यांच्या संस्कारशील व संवेदनशील व्यक्तिमत्त्वाचे प्रतीक जणू साकारले. त्याचबरोबर निवाऱ्यात वास्तव्यास असलेल्या बेघर बांधवांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले. प्रेम, आपुलकी व माणुसकीची ऊब देणाऱ्या या स्नेहभोजनाने वातावरण भावूक झाले. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामेश्वर भिसे, प्रबंधक श्री. राजेश गीते,श्री. सुरेश गीते, सौ. योगिता गीते, सौ. शुभांगी ढुके, गाडगे बाबा सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष रोहन बुंदेले तसेच प्रा. अनिल भिलकर, प्रेम अलोट यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी उपस्थित मान्यवर व बेघर निवाऱ्यातील रहिवाशांनी स्व. उषाताई गीते यांना श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या आठवणींना उजाळा दिला.

RNI NO-46973/1986 Mahasagar Akola
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local Editor** Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८ महासागर अकोला
**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, ोमला स्क्रेअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**स्थानिक संपादक : *पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९* (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील )**

# जागतिक ध्यान दिनाचे समाजशास्त्रीय महत्व

२१ डिसेंबर हा दिवस जगभर जागतिक ध्यान दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ योग, ध्यान, विपश्यना किंवा अध्यात्मिकी निगडित व्यक्तींसाठी मर्यादित नसून, आजच्या तणावपूर्ण, धावपळीच्या आणि स्पर्धात्मक जीवनात प्रत्येक व्यक्तीसाठी आत्मपरीक्षण, मानसिक शांतता आणि जीवनातील समतोल साधण्याचा संदेश देणारा आहे. आधुनिक मानवाने विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग, माहिती आणि दळणवळणाच्या साधनांमध्ये अभूतपूर्व प्रगती केली आहे; परंतु याच वेळी मानसिक तणाव, अस्वस्थता, चिंता, नैराश्य, एकाकीपणा आणि असमाधान हे जीवनाचे अविभाज्य भाग बनले आहेत. बाह्य प्रगतीच्या वेगात अंतर्मनाची गरज दुर्लक्षित होत चालली आहे. अशा पार्श्वभूमीवर ध्यान ही केवळ आध्यात्मिक साधना न राहता, मानसिक आरोग्य, सामाजिक सलोखा आणि मानवता जपण्यासाठी अत्यावश्यक साधन ठरत आहे. जागतिक ध्यान दिन हे या व्यापक समाजशास्त्रीय संदर्भाचे प्रतीक आहे आणि प्रत्येक व्यक्तीस स्वतःच्या अंतर्मनाशी संवाद साधण्याची संधी देते.

----------------

मानव जीवनातील मानसिक अस्वस्थतेचे थेट प्रतिबिंब समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता अत्यंत गंभीर आहे. आजच्या समाजात सततची स्पर्धा, अपयशाची भीती, आर्थिक अस्थैर्य, सामाजिक अपेक्षांचा ओझा आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या यामुळे व्यक्ती मानसिकदृष्ट्या थकलेली आहे.

कौटुंबिक कलह, घटस्फोट, व्यसनाधीनता, आत्महत्यांचे वाढते प्रमाण आणि सामाजिक हिंसा या सर्व समस्या या मानसिक असंतुलनाचे परिणाम आहेत. समाजशास्त्र सांगते की, व्यक्तीचे मानसिक स्वास्थ्य हे वैयक्तिक मर्यादेत न राहता समाजाच्या आरोग्याशी थेट संबंधित आहे. त्यामुळे मानसिकदृष्ट्या अस्थिर व्यक्तीचा परिणाम केवळ त्याच्या वैयक्तिक जीवनावर नाही, तर कुटुंब, शाळा, कामाचे ठिकाण आणि समाजावरही होतो. ध्यान ही प्रक्रिया व्यक्तीला या बाह्य तणावापासून दूर नेऊन स्वतःच्या अंतर्मनाशी जोडते, त्यामुळे मानसिक संतुलन निर्माण होते आणि व्यक्तीचे सामाजिक वर्तन अधिक सकारात्मक बनते.

ध्यानाची परंपरा प्राचीन मानवतेइतकीच जुनी आहे. भारतीय तत्त्वज्ञान, उपनिषद, योग, बौद्ध तत्त्वज्ञानातील मध्यम मार्ग, जैन धर्मातील आत्मशुद्धीचा विचार, सूफी संतांचे मौन व अंतर्मुखतेचे साधन, ख्रिस्ती मिस्टिसिझम किंवा चिनी ताओ तत्त्वज्ञान या सर्व परंपरांमध्ये अंतर्मुखता, मौन आणि आत्मचिंतन यांना महत्त्व दिले गेले आहे.

या परंपरांचा उद्देश केवळ वैयक्तिक मोक्ष किंवा अध्यात्मिक उन्नती नव्हता, तर समाजात करुणा, संयम, सहिष्णुता, नैतिकता आणि सामंजस्य निर्माण करणे हाच होता. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता, ध्यान व्यक्तीच्या अहंकाराला मवाळते आणि तिला समाजाशी अधिक सुसंवादी बनवते.

जेव्हा व्यक्ती स्वतःच्या विचार-भावनांचे निरीक्षण करू लागते, तेव्हा ती इतरांच्या भावना समजून घेण्यास अधिक सक्षम होते. परिणामी, सामाजिक नातेसंबंध अधिक दृढ होतात, संवाद सुधारतो आणि सामूहिक सहकार्य वाढते.

आधुनिक समाजात तणाव हा जीवनाचा अविभाज्य घटक बनला आहे. भांडवलशाही, उपभोगवाद, सततची स्पर्धा, सामाजिक तुलना, आर्थिक अस्थैर्य, भविष्यातील असुरक्षितता आणि यशाची व्याख्या केवळ पद, पैसा आणि प्रतिष्ठेपुरती मर्यादित झाल्यामुळे व्यक्ती मानसिकदृष्ट्या तणावाखाली राहत आहे.

सतत इतरांशी तुलना करणे, अपयशाची भीती, अपेक्षांचा भार आणि वैयक्तिक ओळखीचा संघर्ष हे मानसिक असंतुलन वाढवतात. ध्यानामुळे व्यक्ती या सततच्या तुलनांपासून व अपेक्षांपासून काही वेळ दूर राहू शकते, वर्तमान क्षणात जगण्याची सवय लागते आणि जीवनातील छोटे, साधे आनंद अनुभवता येतात.

परिणामस्वरूप, व्यक्ती स्वतःच्या जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहू लागते,



मानसिक ताण कमी होतो आणि भावनिक स्थैर्य वाढते.

कौटुंबिक जीवनावर ध्यानाचा परिणामही महत्त्वाचा आहे. आज अनेक कुटुंबांमध्ये संवादाचा अभाव, गैरसमज, वेळेची कमतरता आणि सततचा तणाव यामुळे नातेसंबंध ताणलेले आहेत. घरगुती वाद, संयमाचा अभाव, चिडचिड यामुळे कुटुंबात अस्थिरता निर्माण होते.

ध्यानामुळे मन शांत झाल्यावर व्यक्ती संयमी, समजूतदार आणि संवेदनशील बनते. त्यामुळे संवाद सुधारतो, सहनशीलता वाढते, आणि कुटुंबातील नातेसंबंध अधिक दृढ होतात. शांत मनातून निर्माण होणारी सकारात्मक ऊर्जा संपूर्ण घरच्या वातावरणावर परिणाम करते आणि सामाजिक सलोखा मजबूत होतो.

शिक्षणक्षेत्रात ध्यानाचे महत्त्व आज विशेषत्वाने जाणवते. विद्यार्थ्यांचे जीवन आज प्रचंड स्पर्धेने भरलेले आहे. परीक्षा, गुण, करिअर, पालकांच्या अपेक्षा आणि भविष्यातील अनिश्चितता यामुळे अनेक विद्यार्थी मानसिकदृष्ट्या अस्वस्थ असतात. लहान वयातच तणाव, भीती आणि आत्मविश्वासाचा अभाव जाणवतो.

ध्यानामुळे विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढते, स्मरणशक्ती सुधारते, भावनिक समतोल राखला जातो आणि शिकण्याची प्रक्रिया अधिक आनंददायी बनते. मानसिकदृष्ट्या संतुलित विद्यार्थी पुढे जाऊन समाजात अधिक जबाबदार आणि संवेदनशील नागरिक बनतात. शिक्षणसंस्थांनी ध्यानाचा समावेश करणे काळाची गरज आहे.

कामकाजाच्या ठिकाणीही ध्यानाचे महत्त्व मोठे आहे. दीर्घ कामाचे तास, कामाचा ताण, लक्ष्यपूर्तीची सततची धावपळ आणि नोकरीची असुरक्षितता यामुळे कर्मचारी मानसिकदृष्ट्या थकलेले असतात. याचा परिणाम कार्यक्षमतेवर, आरोग्यावर, वैयक्तिक जीवनावर आणि सामाजिक नात्यांवर होतो.

ध्यानामुळे मन शांत राहते, निर्णयक्षमता सुधारते, तणाव कमी होतो आणि सहकाऱ्यांशी नातेसंबंध सौहार्दपूर्ण बनतात.



डॉ. राजेंद्र बगाटे
९९६०१०३५८२
bagate.rajendra5
@gmail.com
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

त्यामुळे कार्यस्थळी सकारात्मक वातावरण निर्माण होते आणि उत्पादनक्षमता वाढते.

स्त्रियांच्या जीवनात ध्यानाचे महत्त्व विशेषत्वाने जाणवते. अनेक पातळ्यांवर जबाबदाऱ्या, सामाजिक अपेक्षा, कौटुंबिक भूमिका आणि स्वतःची ओळख जपण्याचा संघर्ष यामुळे स्त्रिया मानसिकदृष्ट्या थकतात. स्वतःसाठी वेळ काढणे अनेकदा त्यांना शक्य होत नाही. ध्यान स्त्रियांना स्वतःशी जोडते, अंतर्मनाचा आवाज ऐकायला शिकवते आणि भावनिक बळ देते. मानसिकदृष्ट्या सक्षम स्त्री ही कुटुंबात शांतता आणि समाजात सकारात्मकता पसरवू शकते. त्यामुळे ध्यान केवळ वैयक्तिक नाही तर सामाजिक आरोग्यासाठीही महत्त्वाचे ठरते.

डिजिटल युगात ध्यानाचे महत्त्व अधिकच वाढले आहे. मोबाईल, सोशल मीडिया आणि सतत उपलब्ध असलेली माहिती यामुळे मनाला विश्रांती मिळत नाही. सतत येणाऱ्या सूचना, संदेश आणि आभासी जगातील तुलना यामुळे असमाधान, एकाकीपणा आणि तणाव वाढतो.

अनेकदा लोक आभासी जगात अधिक आणि वास्तवात कमी जगताना दिसतात. ध्यान ही प्रक्रिया माणसाला या डिजिटल गोंगाटातून बाहेर काढते, स्वतःच्या वास्तवाशी जोडते आणि मन शांत ठेवते. काही काळ श्वासावर लक्ष केंद्रित केल्यास मानसिक ताण कमी होतो, भावनिक स्थैर्य वाढते आणि सजगता, आत्मभान आणि संवेदनशीलता विकसित होते.

पर्यावरणीय दृष्टिकोनातूनही ध्यानाचे महत्त्व अधोरेखित होते. निसर्गापासून तुटलेले नाते, अतिरेकी उपभोग, लोभ व प्रदूषण यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होतो. शांत मनातून निसर्गाकडे पाहिल्याने त्याचे महत्त्व जाणवते, जपणुकीची भावना निर्माण होते आणि शाश्वत जीवनशैली स्वीकारण्याची प्रेरणा मिळते. अंतर्मन शांत झाल्यावर बाह्य जगाशी असलेले नाते अधिक सुसंवादी, जबाबदार आणि समतोल बनते.

जागतिक ध्यान दिन साजरा करण्यामागील उद्देश म्हणजे जगभरातील लोकांनी काही क्षण स्वतःसाठी काढून अंतर्मनाशी संवाद साधावा, जीवनाच्या धावपळीला विराम द्यावा आणि जीवनातील खरी मूल्ये जाणीवपूर्वक अनुभवावी. ध्यान कोणत्याही एका धर्माशी, जातीशी किंवा पंथाशी मर्यादित नाही. ते सार्वत्रिक मानवी अनुभवाचे साधन आहे, जे प्रत्येक व्यक्तीस मानसिक स्थैर्य, सामाजिक संवेदनशीलता व जीवनाचा समतोल साधण्याची संधी देते.

समारोप करताना असे म्हणता येईल की, जागतिक ध्यान दिन हा केवळ एका दिवसापुरता उत्सव नसून, तो मानसिक, भावनिक, सामाजिक, पर्यावरणीय समतोल साधण्याचा संदेश देणारा दिवस आहे.

बाह्य प्रगती जितकी महत्त्वाची आहे, तितकीच अंतर्मनाची शांतताही आवश्यक आहे. शांत, स्थिर, सजग आणि संवेदनशील मन हेच सुखी, समतोल आणि समाधानकारक जीवनाचे खरे अधिष्ठान आहे. २१ डिसेंबरचा जागतिक ध्यान दिन आपल्याला हेच शिकवतो की, धावत्या जगात काही क्षण थांबून स्वतःकडे पाहणे, अंतर्मनाशी संवाद साधणे, जीवनातील तणाव कमी करणे आणि समाजाशी सुसंवाद ठेवणे हेच खरे मानवतेचे आणि समृद्धतेचे मूळ आहे.

# केरळमधे कम्युनिस्टांना इशारा

स्टेटलाईन
डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

केरळमधे झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखालील डाव्या आघाडीला जरब फटका बसला, काँग्रेस प्रणित आघाडीची सरशी झाली तर भाजपाने राज्याची राजधानी असेल्या तिरूअनंपुरमवर आपला भगवा फडकवला.

तिरूअनंतपुरमच्या निवडणुकीत १०१ पैकी ५० जागा भाजपाने जिंकल्या, काँग्रेस प्रणित युडीएफला २९ तर मार्क्सवादी प्रणित एलडीएफला केवळ १९ जागा हाताला लागल्या. तिरूअनंतपुरम येथील शहरी मतदारांनी गेली ४५ वर्षांची डाव्या आघाडीची मक्तेदारी निवडणुकीत मोडून काढली आहे.

तिरूअनंतपुरममधील भाजपाचा विजय हा काँग्रेस पक्षाला मोठा धक्का आहे. याच मतदारसंघातून काँग्रेससचे शशि थरूर लोकसभेवर खासदार म्हणून निवडून येतात आणि ते विविध विषयांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची गेले काही महिने उघडपणे प्रशंसा करीत आहेत. थरून यांनी मोदी सरकारचे केलेले कौतुक हे त्यांची वैयक्तिक भूमिका आहे असे काँग्रेसचे प्रवक्ते सांगून हात झटकत असतात पण आता मात्र तिरूअंतपुरम महापालिकेवर भाजपाचे कमळ फुलल्यामुळे काँग्रेसला धक्का बसला आहे.

शशि थरूर हे एकीकडे भाजपाच्या भूमिकेचे व मोदी सरकारच्या निर्णयांचे समर्थन करीत असतात. ते काँग्रेसच्या बैठकांना गैरहजर राहतात पण काँग्रेसचे श्रेष्ठी त्यांची पक्षातून हकालपट्टी करीत नाहीत. केरळमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने एकूण निकाल पाहता बऱ्यापैकी कामगिरी बजावली आहे. ग्रामीण भागात काँग्रेस प्रणित युडीएफआणि मार्क्सवादी प्रणित एलडीएफ यांच्यातच सामना झाला. मात्र शहरी भागात भाजपाने आपला जम बसवायला सुरूवात केली आहे. त्रिपुनिथुर आणि पल्लकड नगरपालिकेत भाजपाने यश मिळवले आहे.

गेल्या वर्षी २०२४ मधे झालेल्या निवडणुकीच्या निकालानेच केरळमधे राजकीय समिकरणे आता बदलत आहेत याचे संकेत दिले होते. काँग्रेस पक्ष डाव्या आघाडीपेक्षा चांगली कामगिरी बजावेल अशी सर्वत्र अपेक्षा होती. पण त्रिशूरमधून भाजपाला विजय मिळेल असा अंदाज कोणी व्यक्त केला नव्हता. मल्याळी चित्रपट सृष्टीतील लोकप्रिय अभिनेता व समाजसेवक सुरेश गोपी यांनी त्रिशूर मतदारसंघातून सीपीआयचे (भाकप) च्या उमेदवाराला ७४, ६८६ मतांनी पराभव केला हे आश्चर्यकारक होते. कम्युनिस्टांचे वर्चस्व असलेल्या केरळ राज्यातून कमळ चिन्हावर भाजपाचे लोकसभेत निवडून जाणारे ते पहिले खासदार ठरले.

केरळमधे लोकसभेच्या २० जागा आहेत. पैकी १८ जागांवर काँग्रेस प्रणित संयुक्त लोकशाही आघाडीचे ( युडीएफ ) उमेदवार खासदार म्हणून विजयी झाले तर डाव्या आघाडीचा केवळ एकच खासदार निवडून आला. लोकसभा निवडणुकीत भाजपाने आपले खाते उघडले पण आजवर सर्वाधिक १९. १४ टक्के मते मिळवली. ही तर भाजपाची सुरूवात होती.

पश्चिम बंगाल व केरळ ही दोन राज्ये डाव्या आघाडीचे गड म्हणून ओळखले जात असत. तृणमूल काँग्रेसच्या ममता बॅनर्जी यांनी कम्युनिस्टांचा गड उद्धवस्त करून दाखवला. आता काँग्रेसने केरळमधे कम्युनिस्ट गडाला हादरे देण्यास सुरूवात केली आहे. केरळमधे भाजपाने आता शिकराव केला असून डाव्या लोकशाही आघाडीबरोबरच संयुक्त लोकशाही आघाडीशी भाजपाला लढावे लागणार आहे. २०१६ मधे केरळमधे डाव्या आघाडीची सत्ता आली व पुन्हा २०२१ मधे केरळमधे सत्ता कायम राखण्यात डाव्या आघाडीला यश मिळाले.

गेली दहा वर्षे केरळमधे डाव्या आघाडीची सत्ता आहे. काँग्रेस पक्षाचा प्रभाव आणि भाजपाचा शिरकाव डाव्या आघाडीला महागात पडू शकतो. आर्थिक घोटाळे व घराणेशाहीचे आरोप यांनी डाव्या आघाडी सरकारला घेरले आहे. सत्ताधारी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला अंतर्गत वादाने पोखरले आहे. त्याचा परिणाम संघटनेवर झाला आहे.

भाजपाने पश्चिम बंगाल व केरळ या दोन राज्यांवर आपले लक्ष्य केंद्रीत केले आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत दोन्ही राज्यात भाजपाची सत्ता आणण्यासाठी पक्षाने कठोर रणनिती बनवली आहे. केरळमधे भाजपाची ताकद जशी वाढेल तसा डाव्या आघाडीचा संकोच होत जाईल. संयुक्त लोकशाही आघाडी आणि डावी लोकशाही आघाडी या दोन आघाड्यांमधे केरळचे राजकारण आजवर फिरत आहे. देश पातळीवर डावे पक्ष व काँग्रेस एकमेकांना साथ देत असले तर केरळमधे कम्युनिस्ट विरूध्द काँग्रेस अशी संघषार्ला धार आहे. आता या लढाईत भाजपाने तिसरा खेळाडू म्हणून प्रवेश केला आहे. आजवर दक्षिण केरळपुरती भाजपाची उपस्थिती मर्यादित होती.

२०१४ पासून म्हणजे नरेंद्र मोदी यांचा राष्ट्रीय क्षितीजावर उदय झाल्यापासून केरळमधे भाजपाचे आकर्षण वाढू लागले आहे. गेल्या वर्षी तिरूअनंतपुरम लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसचे शशि थरूर हे अवघ्या १५, ४७० मतांनी विजयी झाले आहेत. त्याच्या विरोधात भाजपाचे ओ राजगोपाल यांना दुसऱ्या क्रमांकाची मते मिळाली आहेत. २०१६ मधे तिरूअनंतपुरम जिल्ह्यातील नेमोम विधानसभा मतदारसंघातून भाजपाचा आमदार निवडून आला, तेव्हापासून भाजपाच्या मतांच्या टक्केवारीत सतत वाढ होत आहे. केरळमधे अल्पसंख्यक मतदार ही युडीएफ व एलडीएफ आघाडीची व्होट बँक समजली जाते. राज्यात ४५ ते ५० टक्के मतदार हा अल्पसंख्यक आहे. केरळमधील लोकसंख्येत मुस्लिमांची संख्या २८ टक्के आहे. खिश्चनांची संख्या १८ टक्के आहे. मुस्लिम झ खिश्चन मतदार हे मोठ्या संख्येने काँग्रेस प्रणित संयुक्त लोकशाही आघाडीला मतदान करतो.

२६ टक्के मतदार असलेली एझवा व्होट बँक ही प्रामुख्याने एलडीएफ (डावी आघाडी) यांना मतदान करते. १४ टक्के मतदार असलेली नायर व्होट बँक मात्र भाजपाकडे वळली आहे.

मुस्लिमांची मते भाजपाला मिळण्याची शक्यता कमी आहे. खिश्चन व एझवा मतदारांना आकर्षित केल्याशिवाय निवडणुका जिंकता येणार नाहीत, हे भाजपाला कळून चुकले आहे. भारत धर्म जनसेना ( बीडीजेएस ) नावाची राजकीय संघटना स्थापन करण्यामागे भाजपाची भूमिका महत्वाची आहे.

डाव्या आघाडी विरोधात नाराजी वाढत आहे. डाव्या आघाडीचे सरकार मुस्लिमांचे लांगुलचालन करते हा समज वाढतो आहे. २०१४ पासून हिंदू मतदारांना त्यांच्या अस्तित्वाची जाणीव करून देण्यास सुरूवात झाली. हिंदू व्होट बँकेचा उदय झाला. त्याचा लाभ भाजपाला होऊ लागला आहे.

■ ■ ■

## वाचक लिहितात

### मुलांवर वास्तववादी महापुरुषांची चरित्रे बिंबवा!

खिसमस तोंडावर आल्याने शहरातील बाजारपेठा लाल टोप्यांनी, सांताक्लॉजच्या मुखवट्यांनी आणि रंगीबेरंगी तोरणांनी सजल्या आहेत मुंबईतील काही ठिकाणी हे स्टॉल्स एवढ्या मोठ्या संख्येने लावण्यात आले आहेत कि आपण भारतात राहत आहोत कि इंग्लडमध्ये हा प्रश्न पडावा. सध्याच्या स्पर्धेच्या युगात आपल्या पाल्याचा निभाव लागावा यासाठी पालकांचा आपल्या पाल्यांना शाळाप्रवेश घेण्यासाठी कॉन्व्हेंट आणि इंग्रजी माध्यमांकडे कल वाढला आहे त्यामुळे गेल्या काही वर्षांपासून खिसमस आणि सांताक्लॉजची क्रेज भारतात झपाट्याने वाढते आहे. दसरा दिवाळीसारखा खिसमससुद्धा साजरा होऊ लागला आहे.

खिसमस खरेतर खिस्ती पंथियांचा सण आहे. त्यांनी तो त्यांच्या परंपरेनुसार साजरा करणे योग्य आहे. सध्या मात्र समस्त शाळा महाविद्यालयांतून, खाजगी कंपन्यांच्या कार्यालयातून तो एक मौजेचा दिवस म्हणून साजरा केला जाऊ लागला आहे. खिसमसच्या निमित्ताने रंगवले जाणारे सांताक्लॉजचे काल्पनिक पात्र खरे करून दाखवले जाऊ लागले आहे. मॉल, बाजारपेठा, शाळा-महाविद्यालये यांमध्ये सांताक्लॉजची वेशभूषा करून एखाद्याला येणाऱ्या-जाणाऱ्यांचे मनोरंजन करण्यासाठी उभे केले जाते.

२४ डिसेंबरला रात्री सांताक्लॉज बाबा येतो आणि लहान मुलांसाठी खेळणी आणि खाऊ देऊन जातो अशा भ्रामक कल्पना मुलांच्या कोवळ्या मनावर बिंबवल्या जाऊ लागल्या आहेत. शहरासारख्या ठिकाणी काही शाळांमधूनही पालकांना तसे करण्यास सांगितले जाते. मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून मुलांना वास्तववादी जगाचे भान बालवयापासूनच करून द्यायला हवे. काल्पनिक गोष्टी सांगण्याऐवजी नीती आणि नैतिक मूल्यांचे मूर्तिमंत उदाहरणे असणाऱ्या महापुरुषांची चरित्रे गोष्टीरूपात सांगायाला हवीत. त्यांचे पराक्रम, समाजकार्य आणि त्यांनी केलेला त्याग मुलांना समजवायला हवा.

भारतीयांचे परमभाग्य आहे कि जगभरातील अन्य कोणत्याही देशाला न लाभलेले थोर अवतारी पुरुष, पराक्रमी राजे, क्रांतिकारक, समाजसुधारक, राष्ट्रपुरुष भारताला शेकडोंच्या संख्येने लाभले आहेत. त्यांची चरित्रे आपल्याकडे पुस्तकांसह इंटरनेटवरही उपलब्ध आहेत. ही चरित्रे बालवयापासून मुलांच्या मनावर बिंबवल्यास येणारी पिढी चारित्र्यसंपन्न, धैर्यशील आणि नीतिवान होण्यास नक्कीच मदत होईल. त्यामुळे पालकांनी मुलांवर सांताक्लॉज सारखी काल्पनिक पात्रे बिंबवण्यापेक्षा महापुरुषांची वास्तववादी चरित्रे बिंबवावीत.

■ सौ. मोक्षदा घाणेकर
काळाचौकी, मुंबई.

### निष्काळजीपणाचे बळी.. कठोर शासन होण्याची गरज

बुटीबोरीनजिकच्या अवाडा कंपनीत शुक्रवारी सकाळी पाण्याच्या टाकीचा स्फोट होवून ६ परप्रांतीय कामगारांचा मृत्यू झाला. या घटनेत अनेकजण गंभीर जखमी झालेत. अनेक कंपन्यांमध्ये अशा प्रकारच्या घटना यापूर्वीही घडल्या आहेत. कित्येक कामगारांना जीव गमवावा लागला. त्यांचे कुटूंब उघड्यावर आले. अशा घटनानंतर चौकशीचे गुन्हाळ सुरू होते, थोडीफार आर्थिक मदत दिली जाते. मात्र, जीव परत येत नाही. कोणत्याच कंपनीच्या मालकांना शिक्षा झाल्याचे ऐकिवात नाही. अशा प्रकरणात कठोर शासन व्हायला हवे.

■ नरेश वासनिक, नागपूर.

# शाळा-महाविद्यालयात एनसीसी अनिवार्य करण्याची गरज

आजची पिढी वेगाने बदलणाऱ्या जगात वाढत आहे. तंत्रज्ञानाच्या प्रगतीसोबतच सामाजिक आव्हानांचे स्वरूपही जटिल होत आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, देशभक्ती, नेतृत्वगुण आणि सामाजिक उत्तरदायित्व निर्माण करणारे एनसीसी सारखे प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाचे ठरते. त्यामुळेच शाळा-महाविद्यालयांमध्ये एनसीसीला अनिवार्य करण्याची मागणी काळाची गरज बनली आहे.




**एनसीसीचे बहुआयामी योगदान**

एनसीसी विद्यार्थ्यांना केवळ परेड किंवा ड्रिल शिकवत नाही, तर सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासावर भर देते.

**शिस्त आणि वेळेचे व्यवस्थापन :** दैनंदिन जीवनात आवश्यक असलेले कौशल्य.

**नेतृत्वगुण आणि टीमवर्क :** भविष्याच्या स्पर्धात्मक जगात टिकण्यासाठी अत्यावश्यक.

**आपत्कालीन परिस्थितीचे भान :** पूर, भूकंप, अपघात अशा प्रसंगी एनसीसी कॅडेट्स मोठ्या प्रमाणावर मदतकार्य करतात.

**शारीरिक व मानसिक सुदृढता :** व्यायाम, ट्रेकिंग, कॅम्पिंगमुळे विद्यार्थी आत्मविश्वासी बनतात.

**सामाजिक आणि राष्ट्रीय बांधिलकीचा पाया**

आजचे तरुण सोशल मीडियाच्या जगात गुंतून जाताना दिसतात. प्रत्यक्ष सार्वजनिक कार्य, लोकांशी संवाद, समाजासाठी काम करण्याची भावना हळूहळू कमी होत चालली आहे. एनसीसी समाजातील विविध स्तरातील विद्यार्थ्यांना एकत्र आणते आणि त्यांच्यात राष्ट्रीय एकात्मता, सांप्रदायिक सलोखा आणि देशसेवेची भावना रुजवते. राष्ट्रीय सुरक्षेबाबत जागरूक नागरिक घडविण्यात एनसीसीची भूमिका महत्त्वपूर्ण आहे.

एनसीसी कॅडेट्सद्वारे राबविले जाणारे स्वच्छता अभियान, जलसंवर्धन उपक्रम, वृक्ष लागवड,वाहतूक नियमन,मतदार जागरूकता यांसारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थी समाजकार्यात सक्रिय होतात. शिक्षणासोबतच सामाजिक कर्तव्ये पार पाडणारी पिढी घडवणे ही शिक्षण व्यवस्थेची जबाबदारी आहे, आणि एनसीसी यात प्रभावी साधन ठरते.

**अनिवार्यतेची गरज**

आज पालक आणि विद्यार्थी करिअरकेंद्री दृष्टीकोनातून केवळ गुणांच्या मागे लागतात. व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास, समाजाप्रती दायित्व आणि राष्ट्रभावनेची जाणीव याकडे दुय्यम स्थान दिले जाते. एनसीसी अनिवार्य केल्यास प्रत्येक विद्यार्थ्याला समान प्रशिक्षणाचा लाभ मिळेल. त्यांच्यात उत्तरदायित्व आणि आत्मविश्वास वाढेल. भविष्यातील सक्षम, सजग आणि सुसंस्कृत नागरिक तयार होतील.



प्रमोद जांभुळकर
नागपूर.
९८२३९६९०९७

शिक्षण केवळ पाठ्यपुस्तकापुरते मर्यादित नाही. राष्ट्रनिर्मितीचा पाया शाळा आणि महाविद्यालयातच घातला जातो. विद्यार्थ्यांनी जबाबदार आणि कर्तव्यदक्ष नागरिक म्हणून घडावे, यासाठी एनसीसीचे प्रशिक्षण अनिवार्य करणे आजच्या काळाची खरी गरज आहे. समाज, शैक्षणिक संस्था आणि सरकार यांनी या दिशेने ठोस पावले उचलली, तर उद्याची पिढी अधिक सक्षम, देशाभिमानी आणि संस्कारित होईल- याबद्दल शंका नाही.

■ ■ ■

# सोन्याची योजना सॉवरिन गोल्ड बाँड काय आहे?

सोप्या भाषेत
इन्कमटॅक्स
आणि इन्वेस्टमेन्ट
सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा
सीए. आकाश जी. मुंदडा
जालना.

**प्रश्न :** सॉवरिन गोल्ड बॉंड स्कीम म्हणजे नेमके काय?

■ अनेक लोक सोन्यात पैसे गुंतवतात. त्यांना फिजीकल सोन्यापेक्षा सोन्याच्या वाढत्या किंमतीत रस असतो अशावेळी सॉवरिन गोल्ड बॉंड स्कीम कामी येते. परत सरकारकडे सोनं ठेवण्याऐवजी व परत घेण्याऐवजी सोन्याच्या बॉंड मध्ये देवाण घेवाण होते. यात फिजिकल फार्म मध्ये सोन्याचे व्यवहार होत नाही मात्र गुंतवणूकदाराला सोन्याचे सर्व फायदे मिळतात. सॉवरिन चा मराठी अर्थ ह्यसार्वभोमह्व असा होतो.

**प्रश्न :** सॉवरिन गोल्ड बॉंड ही योजना भारतात का आणली गेली?

■ भारतात सोनं खूप वापरल जात यामुळे विदेशातून खूप सोन्याची आयात केली जाते. मोबदल्यात भारताचे चलन परदेशात जाते हे थांबवण्यासाठी सॉवरिन गोल्ड बॉंड योजना 2015 मध्ये आणण्यात आली नंतर यात सुधारणा ही करण्यात आली.




**प्रश्न :** भारत जास्त सोन्याची आयात कुठून करतात?

■ भारत आयातीद्वारे जास्त करून स्वित्झलंड, हाँगकाँग, दक्षिण आफ्रिका, घाना, उझबेकिस्थान, सुदान, लेबनॉन तथा सुरीनाम यांच्या कडून मागवतात.

**प्रश्न :** रुपयाची किंमत डॉलरच्या तुलनेत घसरत आहे, याचे या योजनेचे काही संबध आहे का?

■ होय, रुपयांची किंमत डॉलर मध्ये कमी होण्याची अनेक कारणे आहेत, त्यात ही योजना आल्यामुळे चांगल्या बाजूने थोडा फरक पडेल, असे तज्ञांचे तथा रिझर्व बँकेचे मत आहे. या योजनेमुळे सोन्याची आयात कमी होण्यास मदत होईल अनेक वषार्नुवर्षे सोन्याची आयात चालु आहे. या मुळे करंट अकाउंट डेफीसीट वाढत आहे आणि या मुळे ही डॉलरच्या तुलनेत रुपया कमी होत आहे.

**प्रश्न :** सॉवरिन गोल्ड बॉड चे महत्वाचे आकर्षण काय आहे?

■ सर्वात महत्वाचा फायदा असा आहे की परिपक्व झाल्यानंतर जेव्हा गोल्ड बॉंडचे पैसे आपण परत घेतो तेव्हा गुंतवणूक दाराला चालु मार्केट किंमतीने परत पैसे मिळतात. ज्या रेटने आपण सोन्याचे बॉंड घेतले होते तीच किंमत परत न मिळता आजची वाढीव किंमत मिळते, हा महत्वाचा फायदा आहे. म्हणजे फिजिकल फार्म मध्ये सोनं न घेतले जाते न दिले जाते तरी सोन्याचे सर्व सार्वभोम फायदे मिळतात.

पुढील आठवड्यात आपण बघणार आहोत की हे बॉंड गिफ्ट म्हणून देता येतात का? बॉड चे मालक कोण? बॉड कोण इश्यू करतात? टी.डी.एस कपात बॉड मध्ये सुद्धा केली जाते की नाही? यात कलम 80 सी चा फायदा करदात्यास घेता येतो का? याचे नवीन बॉंड आले आहे का येणार आहे? जुन्या गुंतवणूक दारांनी काय करावे? इत्यादी बाबींची संक्षिप्त माहिती जाणून घेणार आहोत.

■ ■ ■

# १४ दिवस अक्रोड खाल्ल्यामुळे सकारात्मक बदल



ड्रायफ्रूट्स म्हणजेच सुका मेवा हा पोषक तत्वांचा एक नैसर्गिक खजिना आहे, जो आपल्या शरीराला आवश्यक असणारी ऊर्जा, जीवनसत्त्वे आणि खनिजे पुरवतो. बदाम, अक्रोड, काजू, पिस्ता आणि मनुके यांसारख्या पदार्थांमध्ये प्रथिने, निरोगी चरबी आणि अँटी-ऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात.

बदाम आणि अक्रोड हे मेंदूच्या आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर मानले जातात; ते स्मरणशक्ती वाढवण्यास आणि एकाग्रता सुधारण्यास मदत करतात. सकाळी रिकाम्या पोटी भिजवलेले बदाम खाल्ल्याने शरीराला दिवसभरासाठी आवश्यक असणारी ऊर्जा मिळते आणि चयापचय क्रिया गतिमान होते.

ड्रायफ्रूट्समध्ये फायबरचे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे पचनक्रिया सुरळीत राहते आणि बद्धकोष्ठतेसारख्या समस्या दूर होतात. लोहाचा उत्तम स्त्रोत असलेले खजूर आणि मनुके रक्तातील हिमोग्लोबिन वाढवण्यासाठी उपयुक्त ठरतात, ज्यामुळे ॲनिमियाचा धोका कमी होतो. अंजीर आणि जर्दाळू यांसारख्या फळांमधून मुबलक प्रमाणात कॅल्शियम मिळते, जे हाडांच्या मजबुतीसाठी आवश्यक असते.


बदामामध्ये असणारे व्हिटॅमिन ई त्वचेला नैसर्गिक चमक देते आणि केसांचे आरोग्य सुधारून त्यांचे गळणे कमी करते. जरी ड्रायफ्रूट्समध्ये कॅलरीज जास्त असल्या, तरी ते मर्यादित प्रमाणात खाल्ल्यास पोट दीर्घकाळ भरलेले वाटते, ज्यामुळे अवेळी लागणारी भूक नियंत्रित होते आणि वजन कमी करण्यास मदत होते.

निरोगी जीवनशैलीसाठी दररोज मूठभर सुका मेव्याचा आहारात समावेश करणे हा एक उत्तम आणि सोपा मार्ग आहे. अक्रोडला ब्रेन फूड म्हणतात, परंतु त्याचे फायदे केवळ मेंदूपुरते मर्यादित नाहीत. याशिवाय अक्रोड खाल्ल्याने तुम्हाला अनेक फायदे मिळू शकतात. विशेषतः अक्रोडचे नियमित सेवन केल्याने, आपण २ आठवड्यांच्या आत आपल्या शरीरात बरेच बदल पाहू शकता. आम्हाला सांगा जर तुम्ही सलग २ आठवडे म्हणजेच १४ दिवस दररोज ४ अक्रोड खाल्ले तर त्याचा तुमच्या शरीरावर कसा परिणाम होईल, तसेच अक्रोड खाण्याची सर्वोत्तम वेळ कोणती आहे हे जाणून घ्या.

अक्रोड ओमेगा -3 फॅटी ॲसिड (एएलए) चा चांगला स्रोत आहे. हे मेंदूची जळजळ कमी करते आणि स्मरणशक्ती, लक्ष केंद्रित करणे आणि विचार करण्याची क्षमता सुधारते. दररोज ४ अक्रोड खाल्ल्याने तणाव, चिडचिडेपणा आणि मानसिक थकवा देखील कमी होऊ शकतो. विशेषतः विद्यार्थ्यांसाठी हे खूप फायदेशीर आहे. अक्रोड खराब कोलेस्टेरॉल (एलडीएल) कमी करण्यास आणि हृदयाच्या वाहिन्या निरोगी ठेवण्यास मदत करतात. १४ दिवस दररोज अक्रोड खाल्ल्यास हृदयविकाराचा झटका आणि उच्च रक्तदाबाचा धोका कमी होतो. अक्रोड खासकरून महिलांसाठी फायदेशीर आहे. ह्याचे नियमित सेवन केल्याने संप्रेरकांचे संतुलन राखण्यास मदत होते.

■ ■ ■

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### दाखवायचे दात

मित्रपक्ष म्हणवून घेण्यात
धन्यता मानती सारे
वाटप तिढा सोडविण्यास
का उदार होत नाही थोडे?

कसले मित्र अन
कसले जनहीत ?
पात्रात पाडून घेण्यात
सारे हायेत पटाईत ..

सत्तेच्या लालसे पोटीच
राजकारण चालते
उतु चाललेले मित्रप्रेम
जनता डोळ्यांनी पहाते ..

# ग्रो मल्टिकॅप फंडची मल्टी-कॅप श्रेणीत अव्वल झेप

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २०

बाजारातील तीव्र चढ-उतार, उत्पन्नातील असमान सुधारणा आणि वाढलेल्या जागतिक अनिश्चिततेने भरलेल्या वर्षात ग्रो मल्टीकॅप फंडाने मल्टी-कॅप श्रेणीतील आघाडीचा पर्याय म्हणून समोर येत नुकतीच आपली वर्षपूर्ती केली.

वर्षभराच्या कालावधीत, प्रमुख इक्विटी निर्देशांकांनी माफक परतावा दिला. निफ्टी ५० मध्ये ४.८३ वाढ झाली, तर व्यापक निफ्टी ५०० मध्ये केवळ ०.९३ वाढ नोंदवली गेली. मार्केट-कॅपमुळे कामगिरी अधिकच कमकुवत झाली, ज्यात निफ्टी मिडकॅप १०० मध्ये ०.४५ वाढ झाली तर निफ्टी स्मॉलकॅप २५० मध्ये १०.९९ ची घट झाली. या पार्श्वभूमीवर, ग्रोव मल्टीकॅप फंडाने त्याच्या बेंचमार्क, निफ्टी ५०० मल्टीकॅप ५०-२५-२५ निदेशांकाला मागे टाकत, एका वर्षात ८.०१ परतावा दिला.

फंडाचे पहिले वर्ष बाजारातील बदलत्या परिस्थितीशी जुळणारे होते, ज्यात आरबीआयच्या व्याजदर कपातीचे चक्र, अमेरिकेच्या शुल्क घोषणा आणि भारतीय निर्यातीवरील अतिरिक्त शुल्कासारख्या जागतिक घडामोडी, तसेच वाढत्या भू-राजकीय अनिश्चिततेचा काळ यांचा समावेश होता. या आव्हानांना तोंड देऊनही, पहिल्या वर्षात वेगवेगळ्या निरीक्षण कालावधींमध्ये हा फंड मल्टीकॅप श्रेणीमध्ये सातत्याने अव्वल २५ मध्ये राहिला.

दुसऱ्या वर्षात पदार्पण करत असताना, सर्व मार्केट कॅपिटलायझेशन मधील उच्च-गुणवत्तेच्या संधी ओळखण्यावर आणि शिस्तबद्ध, मूल्य जाणीव ठेवत गुंतवणूक धोरणाद्वारे भारताच्या दीर्घकालीन वाढीमध्ये सहभागी होण्यावर ग्रोव मल्टीकॅप फंड लक्ष केंद्रित करत आहे.

# वोक्हार्ट हॉस्पिटल्सने कुटुंबाला दिली आशा

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर दि. २०



वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूर येथे मध्यरात्री घडलेल्या एका गंभीर हृदयविकाराच्या प्रसंगात ७२ वर्षीय महिलेचे प्राण वाचवण्यात डॉक्टरांना यश आले. वेळेवर मिळालेल्या तातडीच्या उपचारांमुळे हा जीवघेणा प्रसंग टळला. मध्यरात्रीनंतर तिला तीव्र हृदयविकाराचा झटका आला होता. सुमारे तीन तास तिने लक्षणांकडे दुर्लक्ष केले होते, ज्यामुळे परिस्थिती गंभीर झाली होती.

या गृहिणीला संध्याकाळी सतत छातीत दुखत असल्याचे जाणवत होते, पण तिने ते आम्लपित्तामुळे (ॲसिडिटी) झाले असे समजून जवळच्या क्लिनिकमध्ये जाऊन तपासणी केली. मात्र लवकरच तिची अवस्था गंभीर झाली. छातीत तीव्र दडपण, प्रचंड घाम आणि अस्वस्थता अशी गंभीर लक्षणे दिसू लागली. जी तीव्र हृदयविकाराची लक्षणे आहेत. परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन क्लिनिकने तिला तातडीने वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूर येथे पाठवले. हॉस्पिटलमध्ये पोहोचताच आपत्कालीन विभागाने तिच्या परिस्थितीची गंभीरता ओळखली. क्षणाचाही विलंब न करता तातडीचे हृदयविकार उपचार सुरू करून तिला लगेच अँजिओग्राफीसाठी नेण्यात आले.

ही प्रक्रिया इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट कन्सल्टंट डॉ. अमित बल्लमवार यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. तपासणीत हृदयाच्या मुख्य धमनीपैकी एका धमनीत १०० ब्लॉकेज आढळले. डॉ. बल्लमवार आणि त्यांच्या टीमने त्वरीत रक्ताची गुठळी काढून दोन स्टेंट बसवले आणि रक्तप्रवाह सुरळीत केला. थोड्याच वेळात तिची हृदयाची गती स्थिर झाली.

डॉ. बल्लमवार म्हणाले, कार्डिॲक सुविधा असलेल्या रुग्णालयात वेळेवर पोहोचल्यामुळेच रुग्णाचा जीव वाचला. थोडाही उशीर झाला असता तर हृदयाला कायमस्वरूपी नुकसान झाले असते. ४८ तासांत रुग्ण पुन्हा चालू लागली.

वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूरच्या डॉक्टरांनी सांगितले की, १५-२० मिनिटांपेक्षा जास्त काळ छातीत दुखणे जाणवल्यास ते दुर्लक्षित करू नका. त्यांनी सल्ला दिला आहे की, जर छातीत दुखणे, घाम येणे, मळमळ किंवा श्वास घेण्यास त्रास होत असल्यास तातडीने वैद्यकीय मदत घ्या, कारण हे गंभीर हृदयविकाराची लक्षणे असू शकतात

# इत्तीसी खुशी मालिकेचे सोनाली बेंद्रेकडून कौतुक

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २०

सोनी सबवरील इसक या लोकप्रिय कौटुंबिक मालिकेने इंडियन टेलिव्हिजन अकॅडेमी अवॉर्ड्स २०२५ मध्ये बेस्ट शो- ड्रामा हा पुरस्कार जिंकला. सुंबुल तौकीर खान, वरुण बडोला, रजत वर्मा आणि ऋषी सक्सेना यांची मुख्य भूमिका असलेली ही मालिका त्यातील शांत, भावप्रधान, वास्तववादी कथाकथनाबद्दल वाखाणली जात आहे.

सदर यशाविषयी प्रतिक्रिया देताना अन्विता ही मुख्य व्यक्तिरेखा सकारणारी अभिनेत्री सुंबुल तौकीर खान म्हणाली, इत्ती सी खुशी ही कहाणी अत्यंत प्रामाणिकपणे आणि संवेदनशीलतेने सांगितली आहे. या आनंदात सामील होत अभिनेत्री सोनाली बेंद्रेने इन्स्टाग्रामच्या माध्यमातून या टीमचे कौतुक केले आहे. या मालिकेतील भावपूर्णता आणि मालिका साकारण्यासाठी केलेले परिश्रम यांचा हा विजय असल्याचे सोनाली बेंद्रे म्हणाली.




## आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफचा नवीन फंड लॉन्च

**मुंबई** : आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेडने आपल्या लोकप्रिय युनिट लिंक्ड इन्शुरन्स प्लॅन्स अंतर्गत आयसीआयसीआय प्रु सेक्टर लीडर्स इंडेक्स फंड हा एक नवीन फंड लॉन्च केला आहे. या फंडाचा उद्देश भारतीय अर्थव्यवस्थेच्या २० पेक्षा अधिक प्रमुख क्षेत्रांमधील आघाडीच्या कंपन्यांमध्ये गुंतवणूक करून ग्राहकांना एक तयार इक्विटी पोर्टफोलिओ उपलब्ध करून देणे हा आहे.

हा फंड अशा गुंतवणूकदारांसाठी तयार केला आहे जे इक्विटीमध्ये सोप्या, नियमांवर आधारित पद्धतीने गुंतवणूक करू इच्छितात. यामध्ये गुंतवणूकदारांना स्वतंत्र शेअर्स निवडण्याची गरज न पडता बाजारातील प्रमुख कंपन्यांमध्ये सहज गुंतवणूक करता येते.

हा फंड त्या लोकांसाठी योग्य आहे जे पासिव्ह गुंतवणूक धोरणाला प्राधान्य देतात, दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी मुख्य इक्विटी वाटप तयार करू इच्छितात आणि विविध कंपन्यांमध्ये गुंतवणुकीचे संतुलन राखू इच्छितात.

# आजचे राशिभविष्य

**मेष :** जर तुमच्या मुलाने परीक्षेत चांगली कामगिरी केली नाही, तर त्यांना फटकारू नका, तर पुढच्या वेळी त्यांना चांगले काम करण्यास प्रोत्साहित करा. मित्र आणि नातेवाईकांसोबत वेळ घालवणे देखील शक्य आहे.

**वृषभ :** आज तुम्हाला बहुराष्ट्रीय कंपनीकडून ऑफर मिळू शकते. तुमचा व्यवसाय वाढून तो दुप्पट होण्याची शक्यता आहे. सेलिब्रेशनसाठी तुम्ही कुटुंबासह बाहेर जाण्याची योजना आखू शकता.

**मिथुन :** आज केलेल्या गुंतवणुकीमुळे तुमच्या समृद्धी आणि आर्थिक परिस्थितीला फायदा होईल. काही गोष्टींमुळे तुमच्या कामाच्या प्रगतीत अडथळा येऊ शकतो. संयमाने, धीराने वागा.

**कर्क :** दीर्घकाळापासून प्रलंबित असलेले ऑफिसमधील काम आज पूर्ण होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना हा दिवस चांगला जाईल; ते त्यांच्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करतील. आर्थिक परिस्थिती मजबूत होईल.

**सिंह :** एखादी चांगली बातमी मिळण्याची शक्यता आहे. आज तुम्ही कौटुंबिक नात्यांमध्ये सुसंवाद राखण्यात यशस्वी व्हाल. आज मनोरंजनावर पैसे खर्च होऊ शकतात. विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला आहे.

**कन्या :** आर्थिक बाबींमध्ये सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. ज्याच्यावर तुम्ही नेहमीच विश्वास ठेवला होता तो खरोखर विश्वासार्ह नाही हे जाणून तुम्हाला खूप दु:ख होईल. प्रश्न नक्की सुटतील.

**तुळ :** आज नवीन व्यवसायात पैसे गुंतवल्याने तुमचा नफा दुप्पट होऊ शकतो. तुमच्या सकारात्मक विचारांनी खूश होऊन, तुमचा बॉस तुम्हाला एखादी उपयुक्त वस्तू भेट देऊ शकतो. अनावश्यक खर्च कमी करा.

**वृश्चिक :** तुम्ही तुमच्या कुटुंबासह बाहेर जेवायला जाऊ शकता. आज तुमच्या मनात नवीन कल्पना येऊ शकतात, ज्यामुळे तुमच्या व्यवसायात लक्षणीय फायदा होईल. व्यवसायात चांगली ऑफर्स मिळेल.

**धनु :** तुमच्या ऑफिसमध्ये येणाड्ड्या अडचणी अखेर आज दूर होतील. विवाहित जोडप्यांनी अशी आश्वासने देणे टाळावे जे ते पूर्ण करू शकत नाहीत. यामुळे तुमचे नाते बिघडू शकते. प्रकृतीकडे लक्ष पुरवा.

**मकर :** पालकांनी आज त्यांच्या मुलांच्या खाण्याच्या सवयींकडे लक्ष दिले पाहिजे. भविष्यात त्रासदायक ठरतील अशा लोकांशी जास्त संपर्क ठेवणं टाळा. कमी आराम मिळेल, धावपळ होईल.

**कुंभ :** कायद्याच्या विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस खूप चांगला जाणार आहे. तुमच्या वरिष्ठांच्या मदतीने तुमचे कॉलेज प्रोजेक्ट पूर्ण केल्याने तुम्हाला चांगले गुण मिळू शकतात. बाहेर खाऊ नका, आजारपण येईल.

**मीन :** जर तुम्ही नवीन जमीन घेण्याचा विचार करत असाल तर आजच ते करा, चांगला दिवस आहे. याचा भविष्यात तुम्हाला नक्कीच फायदा होईल. तुम्हाला नक्कीच सकारात्मक परिणाम दिसतील.

# विजय हजारे ट्रॉफी कोहली खेळणार पंतच्या नेतृत्वाखाली

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २०



माजी कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहली या हंगामात विजय हजारे ट्रॉफीमध्ये खेळताना दिसतील. रोहित मुंबईकडून तर विराट दिल्लीच्या संघातून मैदानात उतरतील. शुक्रवारी दोन्ही राज्य संघटनांनी आपापल्या संघांची घोषणा केली, ज्यात या दोन्ही दिग्गज खेळाडूंची नावे समाविष्ट आहेत. दोन्ही खेळाडूंनी मुंबईत सराव सुरू केला आहे. रोहित शर्माची सध्या सुरुवातीच्या दोन सामन्यांसाठी मुंबई संघात निवड करण्यात आली आहे. मुंबई संघाचे कर्णधारपद शार्दूल ठाकूर सांभाळतील, तर दिल्लीची कमान ऋषभ पंतच्या हातात असेल. ही स्पर्धा २४ डिसेंबरपासून अहमदाबादमध्ये सुरू होईल.

विराट कोहली दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेत सर्वाधिक धावा करणारे खेळाडू होते. विराट सध्या मुंबईत आहे आणि तिथेच सराव करत आहे. विराट कोहली दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेत सर्वाधिक धावा करणारे खेळाडू होते. विराट सध्या मुंबईत आहे आणि तिथेच सराव करत आहे.

**कोहली १५ आणि रोहित ७ वर्षानंतर स्पर्धेत खेळणार**

कोहलीने विजय हजारे ट्रॉफीमध्ये शेवटचा सामना फेब्रुवारी २०१० मध्ये सर्व्हिसेसविरुद्ध खेळला होता. तर, रोहित ७ वर्षांनंतर विजय हजारे ट्रॉफी खेळणार आहे. त्याने शेवटची स्पर्धा २०१८ मध्ये खेळली होती. दोघेही आता टीम इंडियासाठी फक्त वनडे फॉरमॅटमध्ये खेळतात. रोहित आणि विराट टी-२० क्रिकेट आणि कसोटीतून निवृत्त झाले आहेत.रोहितने नुकत्याच दक्षिण आफ्रिकेविरुद्ध संपलेल्या एकदिवसीय मालिकेत ३ सामन्यांत १४६ धावा केल्या होत्या. यात दोन अर्धशतकांचा समावेश आहे.

रोहितने नुकत्याच दक्षिण आफ्रिकेविरुद्ध संपलेल्या एकदिवसीय मालिकेत ३ सामन्यांत १४६ धावा केल्या होत्या. यात दोन अर्धशतकांचा समावेश आहे.

बीसीसीआयने देशांतर्गत सामने खेळण्यास सांगितले होते. बीसीसीआयने रोहित शर्मा आणि विराट कोहलीला सांगितले होते की, एकदिवसीय संघात आपले स्थान टिकवून ठेवण्यासाठी त्यांना देशांतर्गत स्पर्धांमध्ये भाग घ्यावा लागेल. बीसीसीआयने म्हटले होते की, बोर्ड आणि संघ व्यवस्थापनाने दोन्ही खेळाडूंना स्पष्ट केले आहे की, जर त्यांना भारतासाठी खेळणे सुरू ठेवायचे असेल, तर त्यांना देशांतर्गत क्रिकेट खेळावे लागेल.

**गेल्या हंगामात रोहित-कोहली रणजी खेळले होते**

२०२४-२५ च्या रणजी हंगामात रोहित आणि कोहलीने प्रत्येकी एक रणजी सामना खेळला होता. जानेवारीमध्ये कोहली १२ वर्षांनंतर दिल्लीसाठी खेळले होते, तर रोहितने १० वर्षांनंतर मुंबईकडून सामना खेळला होता.

**विजय हजारे ट्रॉफीसाठी दिल्ली संघ**

ऋषभ पंत (कर्णधार), आयुष बडोनी (उपकर्णधार), विराट कोहली, अर्पित राणा, यश धुल, सार्थक रंजन, प्रियांश आर्य, तेजस्वी सिंग (यष्टीरक्षक), नीतीश राणा, रितिक शौकीन, हर्ष त्यागी, सिमरजीत सिंग, प्रिन्स यादव, दिविज मेहरा, आयुष डोसेजा, वैभव कांडपाल, रोहन राणा, इशांत शर्मा, नवदीप सैनी. अनुज रावत (राखीव यष्टीरक्षक).

**विजय हजारे ट्रॉफीसाठी मुंबई संघ**

शारदुल ठाकूर (कर्णधार), रोहित शर्मा (२ सामने), हार्दिक तामोर, मुशीर खान, सरफराज खान, इशान मुलचंदानी, शम्स मुलानी, तनुष कोटियान, अंगकृष रघुवंशी, तुषार देशपांडे, ओंकार तरमले, सिद्धेश लाड, सिल्वेस्टर डिसूझा, साईराज पाटील, आकाश आनंद, सूर्यांश शेड्गे.

# नेट-झिरो आणि सज्ज शहरांचा मार्ग निश्चित

■ अहमदाबाद दि. २०

अदानी विद्यापीठाने शांतीग्राम,अहमदाबाद येथील आपल्या कॅम्पसमध्ये तिसरी इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट अँड सस्टेनेबिलिटी (आयसीआयडीएस २०२५) आयोजित केली. भविष्यासाठी सज्ज, सक्षम आणि शाश्वत पायाभूत सुविधांवरील संवादाला चालना देण्याच्या विद्यापीठाच्या वचनबद्धतेची ही परिषद साक्ष ठरली.

अदानी विद्यापीठ आणि अदानी सिमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेत भारत आणि परदेशातील धोरणकर्ते, उद्योग क्षेत्रातील नेते, शिक्षणतज्ज्ञ, संशोधक आणि विद्यार्थी सहभागी झाले होते. परिषदेत मार्गदर्शन करताना बाहेती यांनी पायाभूत सुविधा विकास आणि आर्थिक वाढ यांमधील दृढ संबंध अधोरेखित केला. पायाभूत सुविधा नियोजनात डीकार्बनायझेशन, डिजिटलायझेशन आणि हरित वित्त यांचा समावेश करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. नियामक सुधारणा यांसारख्या सक्षम धोरणांचे महत्त्व सांगताना, भविष्यासाठी सज्ज कौशल्ये आणि उद्योग-शैक्षणिक सहकार्य हे बदलत्या पायाभूत गरजा पूर्ण करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरेल, असे त्यांनी नमूद केले.

नयन पारिख अँड कन्सल्टन्सीचे मुख्य कार्यकारी अधिकारी नयन पारिख यांनी अधिक पायाभूत सुविधा उभारण्यापेक्षा अधिक शहाण्या, संसाधन-कार्यक्षम आणि शाश्वत प्रणाली उभारणे हेच पायाभूत सुविधांचे भविष्य आहे,असे प्रतिपादन केले.

# सात्विक-चिरागने रचला इतिहास

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २०




माजी वर्ल्ड नंबर-१ सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या भारतीय जोडीने इ वर्ल्ड टूर फायनल्समध्ये उत्कृष्ट कामगिरी करत इतिहास घडवला आहे. शुक्रवारी त्यांनी लीग सामन्यात मलेशियाच्या सध्याच्या वर्ल्ड नंबर-२ जोडीला, आरोन चिया आणि सोह वूई यिक यांना हरवून पहिल्यांदाच स्पर्धेच्या उपांत्य फेरीत स्थान मिळवले.

हांगझूमधील ऑलिम्पिक स्पोर्ट्स सेंटर जिम्नॅशियममध्ये खेळल्या गेलेल्या या सामन्यात सात्विक-चिरागला पहिला गेम गमवावा लागला. त्यानंतर त्यांनी पुनरागमन केले आणि ७० मिनिटे चाललेल्या सामन्यात १७-२१, २१-१८, २१-१५ अशा फरकाने विजय मिळवला. मलेशियन जोडी पॅरिस ऑलिम्पिकची कांस्यपदक विजेती आहे.

पहिला सेट हरल्यानंतर पुनरागमन केले आणि २-१ ने सामना जिंकला.पहिला सेट हरल्यानंतर पुनरागमन केले आणि २-१ ने सामना जिंकला.आतापर्यंत फक्त सिंधूने विजेतेपद पटकावले या विजयासह सात्विक आणि चिराग हंगामातील शेवटच्या स्पर्धेच्या उपांत्य फेरीत पोहोचणारी पहिली भारतीय पुरुष जोडी बनली आहे. आतापर्यंत वर्षाच्या शेवटी होणाऱ्या इ फायनल्समध्ये भारताची उपस्थिती मर्यादित राहिली आहे. पी.व्ही. सिंधू ही एकमेव भारतीय खेळाडू आहे जिने २०१८ मध्ये हे विजेतेपद पटकावले होते. सायना नेहवाल २०११ मध्ये अंतिम फेरीपर्यंत पोहोचली होती, तर दुहेरीमध्ये ज्वाला गुट्टा आणि व्ही. दीजू यांनी २००९ मध्ये अंतिम सामना खेळला होता.

# शब्दकोडे क्रमांक २३०४



**आडवे शब्द :-**
१) अमर्याद, पुष्कळ
२) एखादी गोष्ट फुगवून सांगणे (वाक्प्रचार)
१०) तात्पर्य
११) बोजा, भार
१३) च्यासाठी
१४) एक जलचर प्राणी
१५) दुसऱ्याच्या मनातील विचार ओळखणारा
१७) फळावरची साल
२१) रसपूर्ण
२२) अर्धांगवायू
२४) फळ, भाजी, कापण्याचे साधन
२५) बारा वर्षांचा काळ
२६) सूर्याचे एक नाव
२७) कट्टर
२९) बारदानाचा तुकडा
३१) शिल्लक राहिलेला भाग
३३) अक्कल नसलेला गरजू
३४) इंद्रिय
३६) सहाचा फटका
३८) निर्धन
४०) अत्यंत गोड
४१) वेदना, खटका
४२) सारखा
४३) बूड
४४) डोंगराच्या माथ्यावरील खडकाळ जमीन
४६) आयुष्य, प्राणी
४९) मनुष्य
५१) अंगातील मस्ती
५२) दाबण्यास, चेपण्यास सांगणे
५४) विश्व, दुनिया
५६) कृष्णोपदेश
५७) आशीर्वाद
५९) मऊ
६१) पिवळ्या रंगाची छटा असलेले
६३) महिना
६४) उणी
६६) सदोदित
६७) किरकोळ सामान
६८) भीती

**उभे शब्द**
१) असामान्य
२) पंख
३) पवित्र
४) धोबी
६) खूप
७) वात्रट
८) जास्तीत जास्त
९) पृथ्वी
१२) खास बातमी
१५) मळलेला
१६) टपा
१८) रविवासर
१९) लाकडाचा चौकोनी रुंद तुकडा
२०) कारस्थान, लबाडी
२५) शहाणा, हुशार
२६) डोंगराचा तुटणारा भाग
२९) पाण्यावरील तेलाचा थर
३०) परमेश्वर
३१) लक्ष, चित्त
३२) सहाचा समुदाय
३४) अवहेलना करणारे
३५) मृत्यूचा राजा
३७) फिकीर तमा
३९) ताकद
४२) घोंगड्या विणणारी जमात
४५) द्रव्य, संपत्ती
४७) वरपांगी
४८) दात
४९) आईवडील
५०) जाणाऱ्या येणाऱ्यांची गर्दी
५३) मागील दरवाजा
५५) उष्ण
५८) घरोघर
६०) अभिप्राय
६२) प्रत्यक्ष, च्या देखत
६३) मर्कट
६५) हीरा, पाचू, माणिक इत्यादी प्रकार
६६) उथळ, मोठी वाटी

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# भाजपच्या विजयाचा विश्वास



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :
राज्यातील २४ नगरपरिषदांसाठी आज मतदान प्रक्रिया पार पडत आहे. त्यानंतर उद्या रविवारी मतमोजणी होऊन निकाल जाहीर केले जातील. तत्पूर्वी, राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी भाजपच्या विजयाचा ठाम विश्वास व्यक्त केला आहे.

उद्याचा निकाल भाजप व महायुतीसाठी विजयाचा दिवस असणार आहे. भाजपला कधी मिळाले नाही एवढे यश या निवडणुकीत मिळेल. विशेषतः जिथे आम्ही कधीच जिंकलो नव्हतो, त्या नगरपालिकांवरही भाजपची सत्ता येईल, असे ते म्हणालेत.

बावनकुळे यांनी आज पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपचा विजय निश्चित असल्याचा दावा केला. ते म्हणाले, उद्याचा निकाल भाजप व महायुतीसाठी विजयाचा दिवस असणार आहे. भाजपला कदी मिळाले नाही एवढे यश नगरपरिषद निवडणुकीत मिळेल.

आम्ही जिथे कधीच जिंकलो नव्हतो त्या नगरपालिकाही आम्ही जिंकणार आहोत. प्रचारात आम्ही पाहिले की, मतदारांचा कल भाजपच्या बाजूने आहे. त्यामुळे आमचा विजय निश्चित आहे. अनेक ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीसोबत नाही. हा अजित पवारांच्या पक्षाचा अधिकार आहे. त्यांचा निर्णय अजित पवार, सुनील तटकरे व प्रफुल्ल पटेल घेतील.

ते पुढे म्हणाले, आम्ही महायुती म्हणून जनतेच्या समोर जात आहोत. कार्यकर्ते आमच्याकडून मोठ्या प्रमाणात अपेक्षा ठेवून आहेत. पण सर्वांना संधी देणे शक्य नाही. त्यामुळे काही ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस वेगळे लढेल. तिथे आमच्यात मैत्रीपूर्ण लढत होईल. या प्रकरणी कटूता निर्माण होणार नाही याची काळजी घेतली जाईल. मुंबईतील जागावाटप दोन दिवसांत होईल. भाजप व शिवसेनेची कोअर कमिटी याविषयी अंतिम निर्णय घेईल.

पहिल्या टप्प्यात शिवसेना व भाजपचे कोअर कमिटी सदस्य चर्चेसाठी बसत आहेत. जिथे कमी जागा आणि जास्त दावेदारी आहे, तिथे काही अडचणी आहेत. पण शेवटी निर्णय अजित पवारांना घ्यायचा आहे. आज पुणे, पिंपरी चिंचवड येथील अनेक कार्यकर्ते भाजपमध्ये येत आहेत. त्यामुळे या दोन्ही ठिकाणी भाजपचा महापौर होईल यात शंका नाही, असे ते म्हणाले.

# पोलीस सेवा मानवकेंद्रित असावी

## रवींद्रकुमार सिंगल यांचे आवाहन : सद्रक्षणाय-खलनिग्रहणाय पुस्तकाचे प्रकाशन



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :
पोलिस सेवा ही मानवकेंद्रीत असावी आणि त्यासाठी संवेदनशीलता, संवाद आणि नैतिक मूल्ये अत्यंत आवश्यक आहेत. नव्या पिढीतील पोलिस अधिकारी, प्रशासकीय सेवक तसेच नागरिकांसाठी हे पुस्तक दिशादर्शक ठरेल, असे प्रतिपादन पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल यांनी केले.

नागपूर शहराचे निवृत्त पोलिस आयुक्त भूषणकुमार उपाध्याय लिखित सद्रक्षणाय-खलनिग्रहणाय या मार्गदर्शक पुस्तकाचे प्रकाशन बुधवारी सायंकाळी पार पडले. याप्रसंगी सीपी रवींद्रकुमार सिंगल, सह पोलिस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, अपर पोलिस आयुक्त वसंत परदेशी, लेखक भूषणकुमार उपाध्याय, प्रकाशक मीडिया लेगसी सर्व्हिसेस ॲण्ड पब्लिशर्सचे पराग जोशी व मीरा टोळे उपस्थित होते.

सिंगल यांनी यावेळी लेखकाच्या प्रदीर्घ सेवाकाळातील अनुभव, अभ्यासपूर्ण लेखनशैली आणि समाजोपयोगी दृष्टिकोनाची प्रशंसा केली. याप्रसंगी सह पोलिस आयुक्त नविनचंद्र रेड्डी आणि अपर पोलिस आयुक्त वसंत परदेशी यांनीही लेखकाच्या प्रदीर्घ सेवाकाळातील अनुभव, अभ्यासपूर्ण लेखनशैली आणि समाजोपयोगी दृष्टिकोनाचे कौतुक केले.

प्रकाशनप्रसंगी मनोगत व्यक्त करताना उपाध्याय यांनी, पोलिस सेवा ही तणावपूर्ण असते. पण तो तणाव दूर करण्यासाठी प्रत्येकाने लेखनाची सवय लावावी व तणावापासून मुक्ती मिळवावी असे आवाहन केले. यावेळी सीपी सिंगल यांनी प्रकाशकांचे रोप देऊन स्वागत केले. सूत्रसंचालन सहाय्यक पोलिस आयुक्त अभिजीत पाटील यांनी केले. कार्यक्रमाला वरिष्ठ पोलिस अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, साहित्यप्रेमी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मविआमध्ये एकमत न झाल्यास दुसऱ्या पर्यायाचा विचार

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २० :
मनपा निवडणुकांमध्ये महाविकास आघाडी म्हणूनच निवडणूक लढवण्याची राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाची भूमिका ठाम असून शिवसेना (उबाठा) आणि काँग्रेस यांच्यात एकमत न झाल्यासच दुसऱ्या पयार्याचा विचार केला जाईल, असे स्पष्ट संकेत पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी दिले.

अजित पवार गटासोबत जाण्याबाबत कोणतीही चर्चा झालेली नसल्याचे सांगताना शिंदे म्हणाले की, महाविकास आघाडी हाच आमचा पहिला आणि प्राधान्याचा पर्याय आहे. मात्र, जर आघाडीमध्ये एकमत झाले नाही तरच दुसऱ्या पर्यायाचा विचार करावा लागेल, असेही त्यांनी या वेळी सांगितले.

# एवढा नालायक निवडणूक आयोग कुठेही नाही : वडेट्टीवार

## भाजपवर सरकारी पैशांतून निवडणुका जिंकण्याचा आरोप



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :
काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी आज राज्य निवडणूक आयोगावर सडकून टीका केली.

निवडणूक आयोग हा भाजपची बी टीम म्हणून काम करत आहे. एवढा नालायक निवडणूक आयोग कुठेही नाही. निवडणुकांच्या अगोदर सरकारी तिजोरीची लूट करून पैसे वाटायचे व त्यातून निवडणुका जिंकायच्या हा भाजपचा धंदा बनला आहे, असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी त्र्यंबकेश्वर नगरपरिषदेत भाजपने एकेका मतासाठी ५० हजार रुपये वाटल्याचाही आरोप केला.

वडेट्टीवार यांनी शनिवारी सकाळी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी निवडणूक आयोग व भाजपच्या कथित संगनमतावर सडकून टीका केली. ते म्हणाले, सध्या सगळीकडे बोगस मतदान व व्होटचोरी सुरू आहे. बिहारच्या एका माजी केंद्रीय मंत्र्याने याविषयी एक धक्कादायक विधान केले आहे. मी 2700 मतांनी हरलो होतो. पण तेथील जिल्हाधिका?्यांनी मला जिंकवले, असे तो म्हणाला. यावरून अंदाज मतचोरीचा अंदाज येतो. हे सर्व काही मतचोरीतून, अधिकाऱ्यांवर दबाव टाकून, धमकावून निकाल फिरवले जातात. हरणाऱ्यांना जिंकवले जाते.

मी एकदा २००९ च्या लोकसभा निवडणुकीवेळी मध्य प्रदेशात पक्ष निरीक्षक म्हणून गेलो होतो. तेव्हा भाजपचा एक मतदार 1 लाख मतांनी पराभूत झाला होता. तेव्हा भाजपचे लोक बंदूक घेऊन होते. त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांवर बंदूक रोखून त्या उमेदवाराला विजयी घोषित करायला लावले. हे असेच सुरू आहे.

मुंबईत १५ लाख बोगस मतदार आहेत. तिथे एका मतदारांचे ३-४ वेळा नाव आहे. बोगस मतदारांचा आकडा याहून अधिक असू शकतो. त्याची तक्रार केल्यानंतरही निद्रावस्थेत असलेला निवडणूक काहीच करायला तयार नाही. उलट सत्ताधाऱ्यांना मदत कशी होईल हेच त्याचे चालले आहे. ब्रह्मपुरीतही बोगस आयडी मिळाले. बेईमानी करून निवडणुका जिंकण्याचा एकमेव धंदा आता भाजपने सुरू केला आहे.

वडेट्टीवार यांनी यावेळी नांदेडच्या धमार्बाद येथे मतदारांना डांबून ठेवल्याच्या घटनेवरही भाष्य केले. ते म्हणाले, धर्माबाद नगरपरिषदेत हजारो मतदारांना डांबून ठेवण्याचा प्रकार घडला आहे. भाजप आमदार राजेश पवार यांच्यावर असे आरोप होत आहेत. भाजपला हार दिसली की तो कोणत्याही थराला जातो. कुणाचा जीव घेतील. कुणाला डांबून ठेवली. कुणाला मारून टाकतील. मतदाराला ५ हजार रुपये वाटले जात असल्याचे ते म्हणाले.

# गटर लाईनच्या समस्येपासून बेसावासियांना मिळणार मुक्ती

## न. प. ला मिळणार २१० कि.मी.ची गटर लाइन : ७१६ कोटी मंजूर





■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा / बेसा, दि. २० :
बेसा नगर पंचायत आणि परिसरातील पिपला, घोगली, व बेलतरोडी येथील नागरिकांची गटार लाइन च्या समस्ये पासून मुक्ति मिळण्याच्या कार्यास नुकताच शुभारंभ झाला आहे. आणि एसटीपी करिता जमीन प्राप्त झालेली आहे.

या गावांच्या मध्ये हजारोंच्या संख्येने लोक राहत आहेत. शेकडो बहुमंजीला इमारते येथे बनत आहेत आणि बनलेल्या आहेत. परंतु यांच्या करिता गटार लाइनची समस्या मात्र सुटत नव्हती. एनेमारडीएने सुरु केलेल्या योजनेचा लाभ न.प. बेसा व परिसरातील लोकांना मिळणार आहे.

न.प. बेसाचे प्रशासक भारत नंदनवार यांना या समस्येबद्दल परिसरातील बरीच निवेदने दिली होती, परंतु न.प. कडे यावर कोणताही उपाय नव्हता. या संबंधीचा प्रस्ताव वर पाठविण्यात आला, नंतर मंजूरी मिळाली. या बाबीचे भूमिपूजन काही दिवसांच्या पूर्वी केंद्रीय मंत्री नितिन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आले. आज पासून एक महिन्यापूर्वी या चारगावांना जोडणाऱ्या चार गटार लाइन्सचे ७१६ कोटींचे, २१० किमी लांबीच्या गटार लाइनचे काम सुरू झालेले आहे. पुढील शिल्लक काम लवकरात लवकर पूर्ण करून बेसा न.प. ला राज्यात प्रथम क्रमांक मिळविण्याचे प्रशासक भारत नंदनवार यांचे प्रयत्न आहेत.

या योजने करिता बेसा न.प. ला एनसारा पार्क परिसरात दोन एकर जमीन प्राप्त झाली आहे ज्यावर एसटीपी प्लांट बनवून त्या द्वारे गटार मधील पाण्याचे शुद्धीकरण करण्यात येणार आहे.

# यूपीएससीमध्ये शेतकऱ्याच्या मुलाचा डंका

## रामटेकचा कार्तिक बावनकुळे देशात १२४ वा



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :
युपीएससीत यश मिळवायचे असेल दिल्लीत जाऊनच सगळे काही होणार नाही, तर खेड्याकडे चला,असा आत्मविश्वास देणारा संदेश रामटेक तालुक्यातील खंडाळा येथील कार्तिक मनोहर बावनकुळे याने आपल्या यशातून दिला आहे.

शेतकरी मनोहर बावनकुळे व रेखा बावनकुळे यांचा मुलगा असलेल्या कार्तिकने केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत (यूपीएससी) घेण्यात येणाऱ्या इंडियन इंजिनियरिंग सर्व्हिसेस (आयईएस) परीक्षेत देशातून १२४ वा क्रमांक पटकावून घवघवीत यश संपादन केले आहे. दुस?्या प्रयत्नात मिळालेल्या या यशामुळे रामटेक तालुक्यातून आयईएस सेवेत निवड होणारा कार्तिक पहिलाच अधिकारी ठरणार आहे.

ग्रामीण भागातून आलेल्या या यशाने संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण आहे. कार्तिकचे प्राथमिक शिक्षण मनसर येथील प्रोव्हिडन्स स्कूलमध्ये, तर माध्यमिक शिक्षण मौदा येथील एनटीपीसीच्या भवन्स स्कूलमध्ये झाले. अकरावी-बारावीचे शिक्षण नागपुरात घेत असताना त्याने आयआयटीचे स्वप्न पाहिले.

मात्र अपेक्षित यश मिळाले नाही. त्यातूनच पुढील वाटचालीसाठी जिद्द निर्माण झाली. २०२२ मध्ये रामदेवबाबा इंजिनियरिंग अँड मॅनेजमेंट कॉलेज, नागपूर येथून इंजिनियरिंग पूर्ण केल्यानंतर त्याने गेट आणि युपीएससी परीक्षांची तयारी सुरू केली.

रामटेक परिसरातून अलिकडच्या काळात युपीएससीत यश मिळवणारा कार्तिक पहिलाच असल्याने त्याच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. नेते, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते यांची त्याच्या घरी अभिनंदनासाठी रीघ लागली आहे. आई रेखा व वडील मनोहर यांचा आनंद गगनात मावेनासा झाला आहे. कार्तिकच्या मामांचा मुलगा यापूर्वीच एमपीएससी उत्तीर्ण होऊन शासकीय सेवेत उच्च पदावर कार्यरत आहे, ही बाबही उल्लेखनीय आहे. साधारण परिस्थितीतून आलेल्या या यशामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी कार्तिक बावनकुळे हे प्रेरणास्थान ठरत असून, परिश्रमांच्या जोरावर आकाश गाठता येते, हे त्याने दाखवून दिले आहे.

२०२३ मध्ये पहिल्या प्रयत्नात त्याला यश मिळाले नाही. तरीही त्याने चिकाटी सोडली नाही. २०२४ मध्ये वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड (डब्ल्यूसीएल) मध्ये नोकरी मिळाल्यानंतरही त्याने आपले स्वप्न जिवंत ठेवले. अखेर २०२५ च्या परीक्षेसाठी सहा महिने आधी नोकरीचा राजीनामा देत पूर्णवेळ अभ्यासाला स्वतःला वाहून घेतले. या अथक परिश्रमांचे चीज झाले.

# ४१ भूमिगत नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण

■ वृत्तसंस्था, हैद्राबाद, दि. २० :
तेलंगणामध्ये नक्षलवादी हिंसाचाराच्या विरोधात सुरक्षा दलांना मोठे यश मिळाले आहे. राज्यात सक्रिय असलेल्या बंदी घातलेल्या नक्षलवादी संघटनेच्या ४१ भूमिगत कार्यकर्त्यांनी एकाच वेळी आत्मसमर्पण केले.

यामध्ये संघटनेच्या सहा वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. हैदराबादमध्ये पोलिस महासंचालक बी. शिवधर रेड्डी यांच्या उपस्थितीत झालेले हे आत्मसमर्पण २०२५ मधील सर्वात महत्त्वाच्या घटनांपैकी एक मानले जात आहे.

आत्मसमर्पण करणाऱ्यांमध्ये कंपनी प्लाटून समिती सदस्य आणि विभागीय समिती सदस्यांच्या पातळीवरील सहा वरिष्ठ नक्षलवाद्यांचा समावेश होता. या वर्षी राज्यातील हे सर्वात मोठे सामूहिक आत्मसमर्पण आहे, ज्यामुळे नक्षलवादी संघटना धोरणात्मकदृष्ट्या कमकुवत झाली आहे.

आत्मसमर्पण दरम्यान, नक्षलवाद्यांनी एकूण २४ शस्त्रे आणि मोठ्या प्रमाणात दारूगोळा आत्मसमर्पण केला. यामध्ये एक इंसास लाईट मशीन गन, तीन एके-४७ रायफल, पाच एसएलआर, सात इंसास रायफल, एक बीजीएल बंदूक, चार ३०३ रायफल, एक सिंगल-शॉट रायफल आणि दोन एअरगन यांचा समावेश होता. ७३३ जिवंत काडतुसे आणि आठ बीजीएल शेल देखील जप्त करण्यात आले.

आत्मसमर्पण करणाऱ्यांमध्ये पीएलजीए बटालियन कमांडर मंगा उर्फ मंगल, एरागोल्ला रवी, कोरसा लाच, योगेश यांचा समावेश असल्याचे पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले.

# कोळसा खाणीत मृतावस्थेत आढळला वाघ



■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. २० :
वणी वेकोलीच्या नायगाव कोळसा खदानीनजीक शिव मंदिर परिसरात आज शनिवारी सकाळी वाघ मृतावस्थेत आढळला. वीज प्रवाहाच्या धक्क्याने वाघाचा मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. या वाघाचे वय तीन ते चार वर्ष असल्याचे सांगण्यात येत आहे.

वणी क्षेत्रात वाघ मृतावस्थेत असल्याची माहिती कोळसा खाणीतील कामगारांनी आज सकाळी वन कर्मचाऱ्यांना दिली. माहिती मिळताच वणी वन विभागाचे अधिकारी, कर्मचारी तसेच शिरपूर ठाण्याचे पोलीस कर्मचारी यांनी घटनास्थळ गाठले.

वाघ ठार झालेल्या स्थळाची पाहणी करून पंचनामा केला. वाघाचा मृत्यू नेमका कशाने झाला याबाबत तर्क वितर्क लावले जात आहे. वीज प्रवाहाच्या धक्क्याने हा वाघ ठार झाल्याची शक्यता व्यक्त होत आहे. या संदर्भात अधिक माहिती घेण्यासाठी डिएफओ यशवंत यांना विचारणा केली असता, वाघ मृतावस्थेत आढळल्यानंतर सर्वबाजूने तपास सुरू केल्याचे त्यांनी सांगितले.

पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांचे पथक वाघाचे शवविच्छेदन करत आहे. हा अहवाल आल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण कळेल, तोपर्यंत निश्चित माहिती देता येणार नाही असे ते म्हणाले. सायंकाळपर्यंत सर्व माहिती देवू असे त्यांनी सांगितले. या घटनेची माहिती सर्वत्र पसरताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली होती.

आज ज्या परिसरात वाघ मृतावस्थेत आढळला, त्याच परिसरात चार वर्षांपूर्वीही तरुण वाघ नदीत मृतावस्थेत आढळला होता. तेव्हा वीज प्रवाहाच्या धक्क्याने त्या वाघाचा मृत्यू झाला होता. त्याच पद्धतीने आज वाघ मृतावस्थेत आढळला. त्यामुळे हा शिकारीचा प्रकार असल्याची चर्चा आहे.

हा वाघ पांढरकवडा तालुक्यातील टिपेश्वर अभयारण्यातील असण्याची शक्यता व्यक्त होत आहे. त्यादृष्टीने वन विभागाने तपास चालविला आहे. यापूर्वी टीपेश्वर अभयारण्य, ताडोबा व्याघ्र प्रकल्पातही फास लावून, विजेचा प्रवाह सोडून वाघांना ठार मारण्याचा प्रयत्न झाला आहे.

# विवाहित महिला उमेदवारांन विवाहापूर्वी की विवाहानंतरचे नाव?

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :
नागपूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीत विवाहित महिला उमेदवारांनी विवाहापूर्वीचे किंवा विवाहानंतरच्या नावांपैकी कोणते नाव उमेदवारी अर्जावर नमूद करावे, याबद्दल राज्य निवडणूक आयोगाने निर्देश दिले आहेत.

यासंदर्भात लोकांमध्ये संभ्रम असल्याचे निदर्शनास आल्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने स्पष्ट निर्देश दिले आहेत. निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक महिला उमेदवाराचे नाव संबंधित मतदार यादीमध्ये असणे आवश्यक आहे. त्यामुळे नामनिर्देशनपत्र दाखल करताना विवाहित उमेदवारांना मतदार यादीमध्ये असलेल्या नावानेच उमेदवारी अर्ज दाखल करावा लागणार आहे.

निवडणूक लढविण्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या विवाहित महिला उमेदवारास मतदार यादीमध्ये व नामनिर्देशन पत्रामध्ये नमूद असलेल्या नावाखेरीज मतपत्रिकेवर इतर नावाचा उल्लेख करावयाचा असल्यास उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी तसा विनंती अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे सादर करावा लागेल.

ज्या नावाचा उल्लेख मतपत्रिकेवर करावयाचा आहे. त्याच्या पुष्ठर्थ आवश्यक पुरावे (विवाह नोंदणी प्रमाणपत्र, राजपत्रात प्रसिद्ध केलेले विवाहानंतरचे नाव) सादर करणे अनिवार्य आहे.
विवाहित महिला उमेदवारांकडे वरील प्रमाणपत्र तसेच राजपत्र उपलब्ध नसल्यास मतदाराने मतदान करण्यापूर्वी आपली ओळख पटविण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाचे ८ नोव्हेंबर २०११ रोजीच्या आदेशात नमूद केलेल्या १७ पुराव्यांपैकी छायाचित्र असलेला कोणताही एक पुरावा सादर करणे आवश्यक राहिल.

# हिंदु-मुस्लीम प्रकरणात धावून येणारे आता कुठे पळाले?

## शेतकऱ्याचे किडनी विक्री प्रकरण गंभीर तरीही मुख्यमंत्री, पालकमंत्री बेपत्ता



■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. २० :
नागभीड येथील रोशन कुळे यांचे प्रकरण केवळ शेती विकण्यापुरते मर्यादीत नाही तर येथे एका लाखाचे कर्ज फेडण्यासाठी गरीब शेतकऱ्याला स्वतःच्या शरीरातील महत्वाचा अवयव मूत्रपिंड विकावे लागले आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर मानव अवयव तस्करीचेही हे प्रकरण आहे. अशा गंभीर प्रकरणात विदभार्चे त्यातल्या त्यात चंद्रपूरचे सुपूत्र म्हणवून घेणाऱ्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पीडित शेतकऱ्याची भेट घेण्याची, साधा फोन करून विचारपूस करण्यासाठी वेळ नाही.

मुख्यमंत्रीच काय पालकमंत्री, खासदार, आमदारांनीही या प्रकरणाची दखल न घेणे ही अतिशय गंभीर गोष्ट आहे. हिंदू मुस्लीम विषय असता तर आज सर्वजण धावून आले असते मात्र येथे कपाळावर शेतकऱ्याची पट्टी बांधली आहे. त्यामुळे शेतकऱ्याला कुत्र्या मांजरा एवढेही महत्व राहिले नाही अशी टिका माजी मंत्री बच्चू कडू यांनी केली.

बच्चू कडू यांनी शनिवारी सकाळी नागभीड तालुक्यातील मिंथूर येथे जावूनपीडित शेतकऱ्याची भेट घेतली तथा आस्थेने चौकशी केली. यावेळी प्रसार माध्यमांशी बोलतांना बच्चू कडू यांनी राज्यातील महायुती सरकारवर टीका केली. विदभार्तील गरीब कुटूंबातील शेतकऱ्याला सावकारांकडून घेतलेले कर्ज फेडण्यासाठी स्वतःच्या शरीरातील एक अवयव विकावा लागतो ही अतिशय गंभीर गोष्ट आहे असेही कडू म्हणाले.

सदर प्रकरण केवळ शेती विक्री पुरते मर्यादित राहिले नाही. हे प्रकरण आंतरराष्ट्रीय स्तरावर गेले आहे. तेंव्हा या प्रकरणात १९९४ चा बेकायदेशीर अवयव विक्रीचा थोटा ॲक्ट नुसार गुन्हा दाखल करावा अशीही मागणी कडू यांनी केली.

यासोबतच अवयव तस्करी प्रकरणात दलाल, एजंट, सावकार, डॉक्टर यांच्यावरही गुन्हा दाखल करावा, मानवी तस्करी, अपहरण, फोन करून धमक्या देणे, मारहाण, फसवणूक, पासपोर्ट ॲक्ट आदी गुन्हे दाखल करावे अशीही मागणी कडू यांनी केली.

खासगी सावकारांकडून शेतकऱ्यांकडून बळजबरीने कर्ज वसुलीचे गुन्हे राज्यात सर्रास घडत आहे. तेंव्हा या प्रकरणी सावित्रीबाई फुले यांच्या नावाने सत्यशोधक समिती गठीत करावी अशीही मागणी केली.

शेतकऱ्यावर कर्जासाठी शेती सोबतच किडनी विक्रीची वेळ येणे हे प्रकरण आम्ही गांभीर्याने घेतले आहे. या लढाईत आमच्या सोबत आता रोशन कुळे हा देखील आहे.

केवळ नागभीड, चंद्रपूर जिल्ह्यापुरते हे प्रकरण मयार्दीत नाही तर आम्ही संपूर्ण राज्यात आंदोलन करू असाही इशारा बच्चु कडू यांनी दिला. विदर्भाचे मुख्यमंत्री असतांनही फडणवीस यांनी हे प्रकरण गांभीर्याने घेतले नाही, पिडीत शेतकऱ्याची भेट तर सोडा साधा फोन देखील केला नाही. यावरूनच मुख्यमंत्री शेतकऱ्यांच्या प्रश्नवर किती गंभीर आहे हे दिसून येते अशी खोचक टिकाही कडू यांनी केली. दरम्यान या प्रकरणी विविध मागण्यांचे निवेदन तहसीलदार यांनाही दिल्याचे कडू यांनी सांगितले.

### ३ जानेवारी रोजी नागभीड बंद

येत्या ३ जानेवारी रोजी सावित्रीबाई फुले आणि जिजाऊ जयंती दिनी मिंथूर येथे रोशन कुळे याचे घरापासून ते नागभीड पर्यंत भव्य लॉग मार्च काढण्यात येणार आहे. रोशन याचे पैसे परत द्या यासाठी आम्ही राज्यव्यापी आंदोलन छेडणार आहे. नागभीड बंद पुकारण्यात आला आहे. किडनी काढल्यामुळे रोशनच्या आयुष्याचे नुकसान झाले आहे. तेव्हा नागभीड बंदच्या एल्गारमध्ये सहभागी व्हावे असेही आवाहन कडू यांनी केले